ग्रं. सं. ठाणें
काव्य
१४३२



REFBK-0010557
REFBK-0010557

# मन्दिर

के. आत्माराम

मराठा ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम २४०२१ दि:
क्रमांक ९-०३२ नों. दि. १६।७।५८
मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. १०५५८
REFBK-0010557
REFBK-0010557

# मंदिर

[ निवडक कवितांचा संग्रह ]

कवि

के. अम्बादास

प्रस्तावना

कवि ‘ यशवन्त ’

किंमत

रुपये दोन फक्त

प्रथमावृत्ति ९ एप्रिल १९५९

प्रकाशक

पंडित अनंत कुलकर्णी
कु ल क र्णी ग्रं था गा र
१८६ शनवार, पुणें २.

मुद्रक

वि. श्री जोगळेकर
सं जी व न मु द्र णा ल य
६९३ बुधवार पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २४०२१ वि: ...
क्रमांक १०३२ नों: दि: २९।५।५८

त्या जगन्माउली

श्री जगदंबेच्या

पवित्र चरणीं नम्रभावें

समर्पण—

गेल्या वीस वर्षांमध्यें माझ्या हातून जें थोडें फार काव्य-लेखन झालें त्यांतील कांहीं भाग चोखंदळ रसिकांपुढें ठेवण्याचा सुयोग आज येत आहे. यांतील बहुतेक कविता निरनिराळ्या नियतकालिकांतून व कवितासंग्रहांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. बऱ्याच प्रसिद्ध आणि फारच थोड्या अप्रसिद्ध अशा कवितांचा हा संग्रह ' मंदिर ' या नांवानें पुढें येत आहे.

या मंदिराच्या उभारणीस अनेकांची मदत झाली आहे. राजकवि यशवंतांसारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ कवीची प्रस्तावना लाभल्यानें या ' मंदिरा'ला मंगल तोरणच मिळालें आहे.

माझे कवि मित्र श्री. सुधाकर भोसले यांनीं कित्येक कविता पारखून देण्याचें अवघड काम मोठ्या आस्थेनें केलें आहे. तसेंच माझी पत्नी सौ. प्रतिभा कुलकर्णी यांची मदतहि कांहीं कमी नाहीं. त्यांच्या दोन कविताहि या संग्रहास मिळाल्या आहेत.

आकाशवाणी, मुंबई यांनीं कांहीं कविता प्रसिद्ध करण्यास जी परवानगी दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

मित्रवर्य पंडितराव कुलकर्णी यांनीं अत्यंत तत्परतेनें काव्यसंग्रह प्रकाशित केला म्हणूनच मी तो आज रसिकांपुढें ठेवूं शकत आहे.

के अम्बादास
(शं. वि. कुलकर्णी)

वर्ष प्रतिपदा शके १८८१

**श्री. शं. वि. कुलकर्णी**
एम्. ए. एम्. एड्
ओ १२, म्युनिसिपल कॉलनी नं.७,
घोरपडे पेठ, पुणें २.

# " मंदिरांत " पाऊल ठेवतांना—

के. अंबादास ह्यांना मीं प्रत्यक्ष पाहिलेलें आहे कीं नाहीं आठवत नाहीं; पण त्यांचें नांव अधून मधून दृष्टीस पडतें आणि दृष्टि वेधूनहि घेतें. आज़ त्यांचा कवितासंग्रह हातीं आला तेव्हां त्यांची खरी ओळख पटली—अर्थात तीहि ओझरतीच

संसार काव्यमय व्हावा, संसाराचें काव्य अनुभवावें आणि संसारांतून काव्य फुलवावें अशी त्यांची प्रकृति स्पष्ट होत आहे. जीवितांत सहधर्मचारिणीचा पदक्षेप होतांच " प्रतिभा मसणवटीच्या मार्गं गेली ' असा त्यांचा विलाप असला तरी त्यांच्या सहधर्मचारिणीनें त्यावर दिलेलें उत्तर अतिशय हृद्य आहे.

चार ओळिंचीं कवनें करणें
प्रतिभेचें जें नव्हेंच देणें,
क्षणांत वाचुनि विसरुनि जाणें
तो आभासच रे, कवीवरा !
उदात्त ध्येयें उरीं बाळगुन
जीवन संगर नित्य चालवुन
प्रकटे साऱ्या अनुभूतींतुन
सत्स्फूर्ति तीच रे, कवीवरा !
स्वप्निल काव्यें जरी थांबलीं
अनादि सत्यें उभीं ठाकलीं,
म्हणोत कोणी प्रतिभा मेली,
ती जीवनदायी, कवीवरा !

हा दिलासा, किंबहुना दृष्टि देणारी सहचारिणी लाभली असल्यावर ' प्रतिभा मेली ' म्हणून शोक करायला कारणच उरत नाहीं.

आणि प्रतिभा कां अशानें मरतें? उसनें बळ अंगीं आणलेलें असलें म्हणजे प्रतिभा मरेल. प्रतिभेशीं नातें नसलेल्या कांहीं कविता आढळतातहि ह्या संग्रहांत. पण त्या अल्पच आहेत. कवीच्या नजरेला कसल्याच झांपडी नसून ती सर्वसंचारी आहे, एव्हढा दावा मांडण्यापुरत्याच त्या आहेत. पण खरें प्रतिभा-

स्फुरण ह्या कविता संग्रहांत कितीक ठिकाणीं आढळून येतें. ‘ अव्दैताची ओळख ’ ही पतिपत्नीच्या वैवाहिक जीवनानंदाचा साक्षात्कार देणारी कविता हेंच सिद्ध करील. ‘ माझें घर ’ ह्या कवितेंतील संसाराची पार्श्वभूमि किती सोज्वळ आहे. त्याच प्रमाणें कवीमनाला सामाजिक विषमतेचीं, आपदांचीं, दैन्याचीं शल्यें सलत आहेत, हें पाहून त्याच्या व्यापक सहानुभूतीची साक्ष मिळते. ह्या दृष्टीनें ‘मनीषा,’ ‘कर्तव्याची जाणीव,’ ‘अंतर,’ ‘घट भरले माझे’ अशा कविता चित्तवेधक आहेत.

‘दीप लावियेला’ अशा सारख्या कवितांवरुन कविप्रकृतीचा कणा स्पष्ट होतो. पण त्या दीपमालिकेंतला

प्रतिभा–चिलीमीं अक्षर–तमाखू
रस धूमवाया अंगार ठेवीला

‘ हा शेवटचा ’ दीप मात्र दृष्टांतोपमांनीं भलताच अभिनव झाला आहे. अभिप्रेत नसूनहि चेंष्टा होत आहे दिव्यत्वाची !

छंदाचें वैचित्र्यहि आढळतें ह्या संग्रहांत. पण त्यांत रचनाशुद्धतेकडे काणाडोळा बराच झाला आहे. मला माहीत नाहीं के. अंबादास आपल्या कविता प्रसिद्धीपूर्वीं कुणा जाणकार सुहृदांना दाखवितात कीं नाहीं ! तसें ते करत नसतील तर त्यांनी जरूर करावें; कारण थोड्याशा परिष्करणानें त्यांच्या कवितेला अधिक सफाईदार आणि डौलदार रूप सहज येण्या-सारखें आहे असें मला हा संग्रह चाळतांना मधून मधून जाणवत होतें.

त्यांची ‘ शोध ’ ही कविता मला विशेष वेधक वाटली. कवितेला गति असावी, रोख असावा त्या दृष्टीनें हा शोध अनंताकडे घेऊन जाणारा आहे. अशा असीमतेचा छंद त्यांच्या प्रतिभेला जडला तर ह्या संग्रहांत प्रत्ययास येणाऱ्या त्यांच्या एक तपावधिक काव्य सेवेला प्रथगात्मतेचें श्रेय लाभेल,

**यशवन्त दि. पेण्ढरकर**

## पायऱ्या


| | | | |
|---|---|---|---|
| पूजन | १ | २५ | मुक्ति मिळाली |
| सुंदर मनमंदिर | ३ | २७ | दुष्ट काळाच्या कायद्यानें |
| पहिली सर | ४ | २८ | पंढरीचा वारकरी |
| वटवृक्षाची पिकली दाढी | ५ | २९ | मनीषा २ |
| पथगायक | ६ | ३० | मराठ्यास- |
| पहांट | ७ | ३१ | बोट भिडवूं बंदराला |
| ओढणी | ८ | ३२ | पिकल्या पिवळ्या पिवळपाना |
| जगाची रीत | ९ | ३४ | अंतर |
| चौघडे वाजती राजघरीं | १० | ३५ | ते बंडखोर हो मोठे ठरले |
| बंधमुक्तता | ११ | ३७ | गोफणवालीस |
| मनीषा १ | १२ | ३८ | सागरा |
| कशासाठीं ? | १४ | ३९ | महात्मा |
| आवाहन | १५ | ४१ | सखे |
| दोन दिसाच्या दुनियेमाजीं | १६ | ४२ | आगीनगाडी |
| केंस पांढरा | १७ | ४३ | ये ललना |
| कर्तव्याची जाणीव | १८ | ४४ | एक दृष्य |
| या शिवारांत पावुनं | १९ | ४६ | घट भरले माझे |
| अनामिकेचे आर्तस्वर | २० | ४७ | कांहीं कणिका |
| बालकाचे बोल | २३ | ४९ | दिशा दिशांना दीप लागले |
| काजळ डोळ्यांत तूझ्या | २४ | ५० | सेवकांची श्रद्धांजलि |

यामिनी गे ५२
माझें घर ५३
अनाथ मी सरकार ५४
डोंबऱ्याचा पोर ५५
अखंड कार्यकरी ५६
अद्वैताची ओळख ५७
दीप लावियेला ५८
रत्नलाभ ५९
लग्नानंतर ६०
वसंतागमन ६१
काळीजाचा कागुद ६२
अखंडभारत खंड ६३
शोध ६४
जाऊं नको तू दूर रे ६५
एका क्षणाचा खेळ! ६६
कोण येणार? ६७
ये रविराया ६८
अंतर २ ६९
७० आराधना
७१ घरीं पाळणा हलूं लागला
७२ ऋण
७३ मानवी विश्व, तो आणि ती
७४ पांखरा
७५ गोविंदाग्रजास
७६ एकच आशास्थान
७८ समाधिस्त आश्रम
७९ प्रभो
८० ये कवी जरासा
८१ जा जरा खेड्यामधीं
८२ विशाल विश्वामाजीं जाऊं
८३ ही नवीन पाऊल वाट
८४ तोच शशि अन् तेच तारे १
८५ तोच शशि अन तेच तारे २
८६ आलिस तूं अन्--
८७ कां उदास होशी कविवरा ?
८८ हा आवडेल कां हार तुला ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम २४०२१ वि. काव्य
क्रमांक १०३२ नों: दि. १५।५।
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. १०४४६
ग्रंथ. शाखा स्थळ

## पू ज न

विटेवरी वीट
रचून होतें का
देवाचें मंदिर ?
साजशृंगारानें
उघडें पडतें
स्वार्थप्रदर्शन !

ओबडधोबड
मनाच्या पत्थरा—
वरतीं कोराया
द्यावें लागतसें
नित्य निमंत्रण
टाकीच्या घावांना.

रत्नहारासाठीं
करावें लागतें
मानसमंथन,
करावी लागते
भावना-कल्पना-
रचना-गुंफण.

नीरांजनांतील
ज्योती पेटवाया
लागतें सुस्नेह,
चक्कींत चंदना
सहावा लागतो
घर्षणाचा दाह.

कणकण सारे
जाळावे लागत
सुगंधाकरितां,
अग्नीचा फुलोरा
सोसावा लागतो
अंगाऱ्याकरितां.

सोसावें लागतें
नाद निर्मावया
दुज्याचें ताडन,
तेव्हांच ब्रह्माच्या
मूर्तीशीं होतसें
सुरम्य मीलन.

तेव्हांच मंदीरीं
परमेश्वराचें
खरें तें पूजन,
जागृत सुस्थांनीं
तेव्हांच मनाचें
होई समाधान.

७-५-१९५८

*

# सुंदर मनमंदिर

पिंजरा देहाचा आंदोले,
प्राणाचा पक्षी तयिं बोले. ॥ धृ० ॥

तननगरीं सुंदर मनमंदिर,
परमात्म्याचा वास निरंतर,
दो नयनांचा पवित्र सागर;
धूं मीपण येथें तव मळलेलें.

'आइबाप, पतिपत्नी' नातीं
वरवरतीं हीं खेळ खेळितीं,
जीवनिं संगर नित निर्मीतीं,
तूं अनंतकोटीं एकटाच रे !

येण्या मार्गोमागाचि जाणें,
या जगतीं क्षण वसती करणें,
शोकसागरीं कां उगि बुडणें ?
तूं भेदभ्रमाचें तोडी जाळें.

१६-५-१९५४

*

# पहिली सर

रिम झिम रिम झिम आज उतरलें
वर्षेचे हे सीकर पहिले. ॥ धृ० ॥
शामल सुंदर मेघघटांतुन
होइ सुधेचें सुमधुर सिंचन,
विरहकाल जणुं सुदीर्घ संपुन
वरुण–धरेचें मीलन झालें.
वाहे शीतल मंद समीरण,
नव चैतन्यें डुलतीं पर्ण,
सुमा–सुमांतुन भरलें जीवन;
तृष्णाकुल वसुधामन धालें.
चातक सेवी नव अमृतकण,
शांत होतसें मयुराचें मन,
वृषभ चालले घरला परतुन;
सकलां सौख्यें न्हाउं घातलें.
उंच अंबरीं तल्लिन होउन
खगवैतालिक गाती प्रभुगुण,
भाविक तटिनी करिती पूजन;
देव नभीं जणु तयें हर्षले.
तरुवसनावृत तुंग पुरातन
आद्यगिरीमुनि सोडुनि ध्यान,
मंगलमय जगताला पाहुन,
प्रभु–प्रसादें प्रमुदित झाले.
तृप्त होतसें अवनीचें मन,
मन्मानस करि कां आक्रंदन ?
चिंतेचें मज न कळे कारण;
उरीं माझ्या काहूर माजलें.

१८–६–१९४८

# वट वृक्षाची पिकली दाढी

वटवृक्षाची पिकली दाढी,
भव्य शरीराची परि ठेवण
तशीच आहे चित्ताकर्षक.

समाधिस्थ कीं दाढीवाला
स्थितप्रज्ञ हा ऋषी असावा
परमेशाचें दर्शन घडवी.

पक्षांचा तर पिताच जणुं हा,
देई त्यांना आश्रयस्थान,
कर्तव्याचें ओझें वाही.

विशाल गगनासमान अंतर,
अंतर ना दे कधिं कोणाला,
हिमालयाची याची उंची.

क्षितिजासमान याची कूस,
वात्सल्याची महान मूस,
सकलावरतीं पसरी छाया.

अनेक शतकांचा इतिहास
लिहिला याच्या पारंब्यावरि,
गभीर परि ना बोलुनि दावी.

अनेक युवयुवतींची कुजबुज
गुंडांच्याही गुंड्या ठाउक,
देशभक्तिचा हा तर साक्षी.

कितीक आले, कितीक गेले,
परी अभंगच ठेवण याची
जरी असे ही पिकली दाढी !

२३-९-१९५७

*

# प थ गा य क

अति सुस्वर गाणें जाई गात
हें पथगायक युगल पथांत. ॥ धृ० ॥
पोटावरतीं धरूनि पेटी
स्वरमाला जणुं गुंफित मोठी
हो सहचरिच्या गाण्या साथी,
प्रियकर फिरवी भरभर हात,
करांत याच्या बहु विद्यूत !
देवीच्या कंठांतुनि येती
'मंद्र, मध्यमा, तार' स्वरें हीं,
दास बनोनी इजला सेविति,
कसलीं गाणीं वर स्वर्गांत ?
तमा कशाला त्यांची येथ ?
प्रपंच सारा यांच्या जवळी,
चिंध्यांची अन् काखीं झोळी,
त्यांतच झोंपें सान छबुकली,
शेंबडिं पोरें संसारांत,
नाचत चालत तीं नादांत.
कुणि यांना द्या, देउं नका वा
चिरगुट किंवा धनधान्यें वा,
शिवीगाळ हे करितिल कधिं ना,
हांक देउनी एक घरांत
मार्ग आक्रमिति आनंदांत.
हिंडत हिंडत दारोदार
मिळेल जें होती खुष त्यावर,
कधिं ना चिंता यांस अनावर,
जगतासंगें स्वच्छंदांत
जीवनयात्रा हे जिंकीत.

४-११-१९४४

# प हा ट

पहाटेचा गार वारा झोंबे अंगाला,
उठवीतो ठायीं ठायीं शेतकऱ्याला.

भूपाळीचा साद येई कानांवरी गोड,
तया संगीताला नाहीं कुणाचीच जोड.

शिवारांत किरकीर किड्यांचींच भारी,
उगीचच कष्ट घेती रातभर सारी.

मंदावतो शुक्रतारा डोंगराच्या मागें,
घरा जाती तारका झोंपाया ढगामागें.

आरवती कोंबडे नी पहाटेस दारीं,
जातीं घरघरतात कुणब्यांच्या घरीं.

तांबड् फुटें गगनांत, चांद घरा जाई,
किलबिल हळूं हळूं विहगांची होई.

रामपहारीं जाई तो कुणबी शेतांत,
संपदा वसति करे जयाच्या करांत.

उठा, उठा, सुखवस्तू लोकांनों हो, आतां,
देई विसांवा थोडासा शेताच्या राजाला !

२-११-१९४२

*

## ओ ढ णी

गगनिं विराजे सायंतारा,
रवी चालला देवा घरला ॥ धृ० ॥

कळप गाइचे धूलिकणांनीं
लपवित चालत रविरायाला,
सुवर्णज्योती टक लावोनी
पाहत असतिल, चल सदनाला.

विहग कोटरीं पहा चालले
अमृतघट पाजण्यां पिलांला,
किवाडांतले डोळे घरच्या
ओढ लाविती मदंतराला.

धूर लोपला धुराड्यांतला,
निशेंत सारा दिवस बुडाला,
उबवुं वाकळीं चिर सौख्याला,
प्रीत पौर्णिमा सुखवि मनाला.

१-७-१९४३

*

# जगाची रीत

दुंदुभी आपस्तुतीच्या वाजती ज्याच्या मुखीं,
संपदा, श्रीकुंभ येती त्यास करण्याला सुखी.

स्वाभिमानाला त्यजोनी लाळ घोटे सर्वदा,
तोच चढतो कांहिं काळें उच्च सिंहासन बडा.

न्यायमार्गें, स्वाभिमानें हिंडतो जो या जगीं,
मत्सरानें त्यास ‘ कुजके ’ हाणिती लाथा उगी.

जो सुकर्में नित्य श्रमतो राहुनी कोठें तरी,
देइना कोणीच भाकर त्यास, उपवाशी जरी.

पारतंत्र्याचें जिणें जो राहण्याला तत्पर,
चघळण्या श्वानापरी त्या मिळत उष्टी भाकर.

नांदती मधुथेंब ज्याच्या नित्य जिव्हाग्रावरी,
वीष जहरी सांठलेलें जरि तयाच्या अंतरीं-

तोच ठरतो आज श्रेष्ठी, डामडौलें वागुनी,
पूजितें जग त्यास स्तुतिचीं गोड सुमनें वाहुनी.

रीत उलटी या जगाची काय सांगू रे तुला,
राहणें तुज या जगीं जर, शीक साऱ्या त्या कला!

३०-१-१९४५

# चौघडे वाजती राजघरीं

चौघडे वाजती राजघरीं ॥ धृ०॥
लहरीवर लहरी उसळोनी,
हवेंत धूसर नाद मिळवुनी,
धूलिकणांना आंदोळूनी,
देत इषारे सर्व घरीं.

दिवे लागती आकाशांत,
खांब विजेचे नी रस्त्यांत,
आयाबाया परतुन येत
दिवे पाहुनी देवघरीं.

धुंधुकलेल्या दिशा जाहल्या,
मंजुळ नादें मोहित झाल्या,
अंगाईला गाउं लागल्या,
पेंगे सृष्टी, गान जरी.

राजद्वारीं दीप झळकती,
पदराआडुनि आणुनि पणती,
कुणी ठेविती तुळशी पुढतीं;
दिवे लागती सर्व घरीं.

जिकडें तिकडें राज्य शांतिचें,
सूर येति ते अंगाईचे,
जीव पेंगती सानूल्यांचे,
विश्रांती घे कामकरी,
चौघडे वाजती राजघरीं.

१-९-१९४९

*

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक 240.29 दि: 3/5
क्रमांक 1032 नों: दि: 24/5/

पडलों होतों एके दिवशीं असाच रानांत
मायभूमिच्या स्वातंत्र्याच्या मग्न विचारांत.

मीठभाकरी कुळवाड्याची होती बाजूस,
कांदाचटणी रुचिवैभव हें शमवि भुकेल्यास.

सभोंवताली वटवृक्षांची छाया घनदाट,
पारंब्यांच्या चवऱ्यांनीं करि मम श्रमपरिहार.

रानपांखरें गोजिरवाणीं गातीं संगीत,
पर्णांनीं शय्या करवीली अतिथीस्तव खास.

पोपट नव्हते मजसम येथें कुठल्या पिंजऱ्यांत,
स्वच्छंदें बोलून करिति ते अतिथी-सत्कार.

अशाच वेळीं डोंगर माथ्यावर मी गुंगींत—
रचीत होतों ध्येयकल्पना मनोमंदिरांत.

लपून होतों देशासाठीं वेषांतर करुनी,
येथ विसाव्यासाठीं पडलों होतों चोरूनी.

देशासाठीं देह झिजविले ज्यांनीं राष्ट्रांत,
होतों पाहत पथ मी पुढचे त्यांच्या प्रतिमांत.

पिस्तुल जवळीं एकच सखि मम निर्जन रानांत,
संकटसमयीं धीरा देउन येई हातांत.

अकस्मात जवळूनि वाजल्या बंदूका कांहीं,
आश्चर्यें मी इकडें तिकडें धुंडोनी पाही.

डोळ्याचें मम पातें लवतें ना लवतें तोंच—
संगिनवाल्यांनीं घेरियलें समजुनि रिपु हाच.

चरणीं खळखळ लोखंडाच्या बेड्या घालोनी,
बंदीशाळा दाखविली मज बहु धमकावोनी.

तऱ्हेतऱ्हेचे उपाय योजुनि हाल जरी केले
निर्धारानें दास आइचा कांहीं ना बोले.

फांसावरतीं चढवीण्याची शिक्षा मज दिधली,
तयार एका पायावर मी, देवच मम वाली !

स्वतंत्रतेच्या मंदीराच्या पायांतिल एक—
दगड बनोनी तळमळणारा आत्मा राहील.

दिसो बंधुंना ध्वज राष्ट्राचा कळसावर त्याच्या,
एकच आशा मनिची माझ्या, पुरवी ती देवा !

*

५-११-१९४४

## म नो षा — १

मला वाटतें बसुनि विमानीं गगनांतीं जावें
अश्रू बनुनी मेघांचे कृषिवलास शमवावें.

घनवर होउनि आकाशांतिल दिगंतिं विहरावें,
कुडकुडत्या गरिबांना कंबल देउनि उबवावें.

कण कण सारे देहाचे या धुळींत मिसळावे,
घरदाराविण जगती त्यांना प्रशांत घर द्यावें.

नीर झऱ्याचें होउनि वाटें सुखांत खेळावें,
तृषित पथीकां सांत्वन देउनि क्षणांत सुखवावें.

रानपांखरें बनूनि मंजुळ वृक्षीं नाचावें,
गाणें गाउनि मोटकऱ्याच्या श्रमास नाशावें.

बनूनि वारा वाटें मजला दिशांत हिंडावें,
घुसुनि घरामधिं रोग्याजवळीं, तयास हसवावें.

पतंग होउनि देउनि प्राणा ज्योतीं चिर व्हावें,
सेवेचें साम्राज्य निर्मिणें हें ना विसरावें.

२८-७-१९४३

*

# क शा सा ठीं ?

तेवतात झोपडींत
        मिण मिण ज्योती शांत,
कशासाठीं अंधारांत
        वीज करिते आक्रांत ?

        बाळ माझा झोपी गेला
                घेऊनीया वाकळीला,
        कशासाठीं खुळखुळा
                वाऱ्यानें या आणीयला ?

राजा माझ्या हृदयाचा—
        अन् राणी मी तयाची,
मौज न्यारीच मीलनाची !
        झरे कुंभ अमृताचा ! !

        परी चंद्र नी यामिनी
                दूर कशासाठीं जाती ?
        भांडणाचा साद आणी
                कानीं कासया आदळी ?

नोहे भांडणाचा साद,
        खेळ 'घटकंचुकी' चा !
पृथिवीच्या स्तनांतूनी
        पूर वोसंडे सुधेचा ! !

१७–७–१९४५

*

# आ वा ह न

ये बैस अशी मम सांगाती,
ना बावरुं, बघ क्षण ही सृष्टी ॥ धृ० ॥
न्याहाळी हें विशाल अंबर
किति असें तयाचें बघ अंतर,
खग आनंदी परि जाती वर,
अन् स्वातंत्र्यीं ते नित उडती,
त्यापरि आम्हां जाणें वरतीं.
बघ चौफेरी अनंत सृष्टी,
अनंत पाउलवाटा दिसती,
बांध कुंपणें यांतुन वसतीं,
या वाटेंतुन जाऊं पुढतीं,
ना बावरुं परि गे कष्टासाठीं.
स्वातंत्र्याच्या चिर सिंहासनिं
जरि बसायचें गे गातच गाणीं,
तरि अखंड श्रम लागे, धर ध्यानीं,
कस कंबर भावी सौख्यासाठीं,
ना बावरुं, बघ क्षण नभसृष्टी.
जरि खडे बोचुनी रुधिर पडे,
अति दूरी जाऊं पुढें, पुढें,
मार्गांतच अन् क्षण होउं खडे,
अवलोकूनी मागें पुढतीं,
चालूं पुढच्या ध्येयासाठीं.
आयुष्याच्या या आकाशीं
विहार कर गे त्वां माझ्याशीं,
अमूप भोगूं अखंड राशी—
सौख्याच्या, नी घेऊं शांती,
नंदनवनिं गे चिर विश्रांती.

२२-७-१९४५

# दोन दिसांच्या दुनियेमाजीं

दोन दिसांच्या दुनियेमाजीं
मानव अपुलें घरकुल उभवी,
नव जोमानें त्यातें नटवी,

आणि अचानक वादळांत त्या
मांडच सारा मोडुनि जाई.

दोन दिसांच्या दुनियेमाजीं
मानव अपुली मती चालवी
मात कराया दुनियेवरतीं,

आणि अचानक वादळांत त्या
बुद्धी सारी भंगुनि जाई.

दोन दिसांच्या दुनियेमाजीं
'शाश्वत' (?) जीवन जगण्यासाठीं
क्षुद्र जंतु करि आटाआटी,

आणि अचानक वादळांत त्या
धडपड सारी व्यर्थच होई !

८-७-१९५१

*

# केंस पांढरा--

केंस पांढरा
दावि वाकुल्या—
आणि अचानक येई हाता,
वार्धक्याची देई ग्वाही.

लोमा, ब्राह्मी, आवळेल ते
बाजारांतुनि धांवत येती,
गुरगुरणाऱ्या शत्रूवरतीं
सुस्नेहाचें लिंपण लाविति.

शीर्षासन मानेवर बसलें !
गुपीत पेंचांची ये पंगत,
परी बिलंदर केंस पांढरा—
ठाउक त्याला सगळ्या रीती.

मंत्रासरशीं सैन्य जमविलें,
पांढुरक्याशा धुक्यामधोनी,
रिपूवरी क्षणिं मात करोनी,
राजा झाला केंस पांढरा.

२१-९-१९५७

*

# कर्तव्याची जाणीव

याच दिनीं मी गत वर्षाच्या
लिहिली होती घोर प्रतिज्ञा,
लिहिली होती रक्त-प्रतिज्ञा,
हाय, पाळितों परि पोटाज्ञा !

अति सुंदरशा वाळूवरतीं
वळवित होतों भंवती दृष्टी,
ध्येय-स्वप्नीं गुंग जाहलों,
व्यर्थ, परी पोटार्थी झटलों !

जीवनवाळू चाले वाहत,
भ्याड परी मी आहे निश्चल,
दिसतो मजला ध्रुवतारा, परि
बंध जाबवेना तोडोनी !

हाय, हाय, हें कशास जगणें ?
सुखासीनता उरिं बाळगणें ?
पशुसम जीवन कशास जगणें ?
याहुन वाटें बरेंच मरणें !

गत वर्षाची स्मरतें का रे—
आण वाहिली जी निर्धारें ?
तोड, तोड हे बंध घराचे,
गातच जा रे गीत क्रांतिचें !

गीत क्रांतिचें ! !

२-१०-१९४४

*

# या शिवारांत पावुनं

या शिवारांत पावुनं ॥ धृ० ॥

जपुन् होवं जाया पावुनं,
काटंकुटं मागुन् पूढुन,
मारुग् सरळ् शिवारांत न,
पाउल् टाका म्होरं बगून.

उस लई उंच वाडला,
प्येरं मोटी अती व्ह त्येला,
घाना आपशी जवळ अन् आला
पाय्जे काय ऊस येक दोन ?

इकडं बगा, कन्सं वाडल्यातीं,
राम राम तुमा करित्यातीं,
आनंदानं मनीं डुलत्यातीं,
हुर्डा चला म्होरं खाऊन.

इकडं आल्या माळावर शेंगा,
लाजुन् तुमा जमिनिंत बगा-
दडल्याती, आनू का ? सांगा,
भरलेल्या खावा बगून.

केळि बगा उंच वाडल्या,
पाचू मोती जनूं व्हं ल्याल्या,
सागत् करन्या तुमचं वाकल्या,
आन्तो खाया येक तोडून.

तूर कुटं डुली मदि मदी,
सावं, राळं कुटं माळामंदी,
भात काळं कुटं कादि कदी,
दौलत् ठेवा आम्र्‌ची बगून.

धर्‌नी माता आली धावुनं
हिर्‌वा हिर्‌वा शालू नेसुनं
आनूलं पोरा फार नटवुनं,
बगा येकवार निरखून.

पक्शी शिवारांतलं आलं,
रविराय पान खाउन् आलं,
थुकुन् खालीं लाल त्येनीं केलं,
बगा, बगा, जाति मावळून.

शेरात् मजा असल् तर सांगा,
शिवार आमुचं असलं बगा,
सांज जाली, येकवार बगा,
साहेब्, जावूं अतां परतून.

१०-१-१९४५

*

# अ ना मि का चे आ र्त स्व र

वाजवीत बसलों एकतारी
गात गाणें जीवनाचें,
भेसूर संगीत निघें तींतून
पीळ निसटले खुंटींचे.

जीवन-पणतीची ज्योत
हळूं हळूं चाले मंदावत,
प्रीत-सुमांच्या हारांतील
सुगंध गेला पार निघून.

प्रेम-पर्णांचे विडे
चालले आतां वाळून,
जीवन जगण्यांतील रस
गेला आतां पार सुकून.

संग्रहालय ठाणे
१०५५०

मस्तीनें भरलेल्या घटावर
पत्थराच्या हृदयानें
पत्थर मारून चोरून
तड्तड् आवाजांनीं
विश्व टाकिलें भरून,
शकलें उडालीं दिशा-दिशांना,
आतां मस्ती गेली पुरी आटून.

जीवनाचा सूर्य आतां
चाले हळुं हळुं मावळतीला,
पसरूं लागे जगत-तलावरि
पंख आपुले भयाण निशा.

एकतारी आयुष्याची
घर घर करूं लागे आतां,
कंप न घेई कंठ माझा,
पुरें आतां जीवन-यात्रा !

× × ×

पहा ! पहा !! तीं आकाशांतून
भुतें पाहतीं आ वासून,
चित्रगुप्तानें झरणि उचलली
नांव लिहाया अपुल्या यादींत !!!

*

२०-१२-१९४८

## बालकाचे बोल

दीन भुकेनें झाला दुबळा,
आई, भिक्षा घाला मजला. ॥ धृ० ॥
फिरतों वणवण पथिं अनवाणी,
मज दुबळ्याला कोणि न जाणी,
मुखिं अडखळते आतां वाणी,
शाळेचा मम समय जाहला,
लेंबे झोळी रिति दंडाला.
अनाथ झालों दंग्यामाजीं
आई बाबा खायीमाजीं-
गायब झाले, ताई माझी ?
माझा उगि कां जीव वांचला ?
गेलों असतों यम-सदनाला.
अंगिं न कुडतें घालायाला,
चिंधि बांधिली मी डोक्याला,
वस्त्र न पुरतें लंगोटीला,
साहूं कुठवर असल्या स्थितिला ?
दुःख-वेदना सांगु कुणाला ?
निर्वासित मी म्हणुनि करावी-
टर कोणीही, शिविही द्यावी,
स्वैरपणें रसना सोडावी,
डाग देउनी दुःखीताला-
मृतवत् करणें, न्याय कोठला ?
मानव्याची लाज असे जरि,
सुसुत भूमिचे असाल कुणि जरि,
भगिनी-मातांनो या दारीं,
सानुकंप मधु वाणी बोला,
पोटीं मायामृत मम घाला.

५-१२-१९४८

# का ज ळी डो ळ्यां त तू झ्या--

काजळी डोळ्यांत तूझ्या देखिलें मी रूप माझें,
भान हरपोनी दिसे गे दर्पणीं त्या दृश्य तूझें.

सेविण्या प्रिय देवतेला लाविलें नीरांजनांना,
धूपपुष्पीं मानसाच्या नादवीलें नादब्रह्मा.

होउनी तल्लीन नादीं नेत्र मिटले मत्तनूचे,
मीलनाच्या सौख्यराशीं ऐक्य झालें अंतरांचें.

परि निमीषीं भंग पावे सुखसमाधी द्वैतभावें,
होउनी जागें म्हणोनी शोधण्या सुख दृष्टि धावे.

परि दिसत डोळ्यांत तूझ्या मत्सरी शत्रूच माझे,
रुधिर तापें तप्तभावें, उष्णतेनें अंग भाजें.

अन् निमीषीं दोन दिसलों तूं नि मी डोळ्यांत तूझ्या,
'तूं नि मी' जावोनि दोघे देखिलें बाळास अमुच्या.

काजळाचा डाग अजुनी दावितो मज गूण तूझे,
काजळी डोंळ्यांत तूझ्या देखिलें मी रूप माझें.

३१-८-१९४८

*

# मुक्ति मिळाली

अरविंदांना मुक्ति मिळाली,
जिवा-शिवाची भेट जाहली ॥ धृ० ॥

अनंतांतुनी मांगल्याची
ज्योत निघाली चिर सौख्याची
आवलि निर्मुनि नव दीपांची
अनंतामधीं विलीन झाली,
बाबूजींना मुक्ति मिळाली.

सलोकतेचें, समीतेचें,
सरूपतेचें, सायुज्याचें—
धन मिळतें दासा प्रभुजीचें
प्रभु-प्रसादें रास लाभली,
अरविंदांना मुक्ति मिळाली.

विशाल विश्वीं विलीन झाल्या-
आत्म्याला ये अरविंदाच्या
सहस्ररश्मी विकसित करण्या,
योग साधना नवी मांडली,
योगींद्रांना मुक्ति मिळाली.

नव्या युगांतिल नव युवकांनो,
जडवादी नी सुधारकांनो,
रूढीवादी सनातन्यांनो,
अध्यात्मानें शांति लाभली,
योगीशांना मुक्ति मिळाली.

अंत्य दर्शना सकल धांवती
भक्त तयांचे भंवति दाटिती
समाधीवरी सुमें उधळिती,
मी ही सुममाला गोवियली,
अरविंदां सु-मनें वाहियली.

८-१२-१९५०

*

# दुष्ट काळाच्या कायद्यानें

माझ्या गांवाची शिवारें
माझ्या गांवाचेंचि वारें
माझ्या मनांत भरतें
जरी दूरी पोटासाठीं.

चविष्ट भाताचे लोंगर
व्रतधारी नी डोंगर
माळावरील निर्झर
माझ्या मनश्चक्षूपुढें

दुष्ट काळाच्या कायद्यानें
हाणीयला क्षणीं बडगा,
आणि करूनि टाकिला
माझ्या मनाचा चुराडा.

मन्मनावरील बळांनीं
माझ्या गांवाला वेदना,
अंतराळांत लहरी
वाचीतात अन्यायाला
दुष्टांच्या त्या लहरींना !

२१-१-१९५७

*

# पंढरीचा वारकरी

पंढरीचा तो वारकरी होता,
बहुत अकिंचन, भक्तिचाचि सांठा !
चरणवहनानें मार्ग आक्रमीतां
बिंदु भक्तीचे ठाव घेत माथा.

पथीं 'संतां' ची बहुत गर्दि होई,
परी म्हाताऱ्या कोण वाट देई ?
तरी ओढा पंढरीसी तयाचा,
जिवाभावाचा दास विठ्ठलाचा.

अंतिं पंढरिमधिं धांव घेत आला,
मुखीं नामाचा गजर चालवीला;
बहुत दिवसांचा असे तो उपाशी,
दाद नाहीं तरि तयाची कुणाशीं !

चंद्रभागेसी कितिक जात होते,
राउळाच्या चालले कितिक पंथें;
पुंडलीकाच्या दर्शना कितीक,
तयांमाजींया असे हाहि एक.

मुखीं, हृदयीं आळवी विठ्ठलाला,
त्याच नादामधिं पूर्ण रंगलेला;
आधि थकलेला, त्यांत तो उपाशी,
तोल जाउनि पातला धरित्रीसी.

चार बाळें त्या बिचाऱ्यास होतीं,
उघडिं झालीं ! भोवली पंढरी ती !
पांडुरंगाच्या भक्तिची 'पताका'
जगतिं हिंडतिं दावीत सर्व लोकां !!

*

१२-१०-१९३७

मला वाटतें होउनि बंदुक हिंसेला त्या मारावें,
'युद्ध' शब्द हा कणा-कणांमधिं ! दूर लोटुनी त्या द्यावें.

लहान मोठा भेद करोनी कशास जगतीं मिरवावें ?
तरिच वाटतें बॉंब बनोनी इमारतींना जाळावें.

ज्ञानाची तडिता बनुनीया रजनीमाजीं खेळावें,
धनवंतांच्या हृदयामधल्या अंधःकारा नष्टावें.

एक चालतो पायानें, तर मोटारींतुनि कुणि जावें,
म्हणूनि वाटें मोळे होऊनि चाकांना त्या दुखवावें.

दुरूनि येउनि टोळधाडिनें पिकास सगळ्या नासावें,
तरिच वाटतें विष होऊनी वाऱ्यासंगें हिंडावें.

नरसिंहाचें रूप घेउनी हिरण्यासुरा नष्टावें,
कधीं वाटतें कच होऊनी संजिवनीला मिळवावें.

आणी वाटें संजिवनीनें नवधरणीला निर्मावें,
त्रिगुणांचें अन् राज्य स्थापुनी सुखेनैव जगिं विहरावें.

२८-७-१९४३

*

## म रा ठ्या स—

वीरवृत्ति दाखिव जगता पूर्विंची मराठ्या,
काळवेळ समजुनि घेउनि हो खडा मराया ॥ ध्रृ० ॥
बहु शतकापासुनि विस्तृत जो असे अखंड,
पुण्य देश अपुला आजीं जाहला द्विखंड,
शतखंड नि पडतिल त्याचे, बसशिल जर थंड,
राखण्यां अखंडच त्याला हो पुढें लढाया.
आग भडकुनी अवनीच्या पोटिं होइ दीन,
शूर, वीर वदवुनि घेसी आपुल्यास जाण,
संकटांत विश्रांती घे मराठाचि तो न,
घे उडी पतंगापरि त्या अग्निमाजि राया.
बांधिलीं महाराष्ट्राला तोरणें जयांनीं,
प्राण पणा लावुनि चिरिले रिपूकंठ ज्यांनीं,
अरिस्त्रियांलागिं सुतेचा दिला मान त्यांनीं,
तेंच कार्य आलें आजहि का न तुझ्या वाट्या ?
ऊठ, ऊठ, शस्त्रा करिं घे, कार्य करी कांहीं,
येइ काळ चालुनि तुजला, शांत तूं न राही,
देइ जगीं सामर्थ्याची 'मराठा' चि ग्वाही,
वेळ दवडतां करिं येतिल नातरी नरोट्या.
मंदिरास स्वातंत्र्याच्या पूर्ण बांधुनीया,
सानथोर पुष्पांचे नी हार अर्पुनीया,
ज्योत झळकुं दे समतेचा दीप लावुनीया,
पूज सदा भूमातेला पवित्रतेनें या.
वीरवृत्ति दाखिव जगता पूर्विंची मराठ्या.

१६-७-१९४७

*

# बोट भिडवूं बंदराला

तूं नि मी दोघे मिळोनी
बोट भिडवूं बंदराला ॥ धृ० ॥

चंद्र शीतल नभिं विराजे,
गान मंजुळ पवनिं वाजें,
हास्य येई सागराला
हलवि प्रेमें गल्बताला.

चांदण्यांचा पदर उडतो,
सिंधुला जाऊनि भिडतों,
पदर त्यापरी तव उडाला
स्पर्श केला मम हृदाला.

प्रीतिच्या नौकेमधीं गे
गुंफुं अपुले प्रीति–धागे,
एक बनुनी वल्हवोनी
जिंकुंया भवसागराला.

*

६–१–११४९

## पि क ल्या पि व ळ्या पिं प ळ पा ना--

पिकल्या पिवळ्या पिंपळपाना
धरिसि उगी कां दुराभिमाना ? ॥ ध्रृ० ॥

रूप-गंध-रस समयें लुटलें,
बघ आतां तुज जरत्व आलें,
अंग जाहलें फिक्कट पिवळें,
जो तो तुडवी, फिक्कट पर्णा,
धरिसि उगी कां दुराभिमाना ?

यौवन जोंवरि तुझ्यांत होतें,
वारे गोष्टी झाले करिते;
धूळ फेकिती तुजवरि परि ते,
आतां माया नसे तयांना,
धरिसि उगी कां दुराभिमाना ?

गुंगीमाजीं श्रेष्ठपणाच्या
हसलास जना पृथ्वीवरच्या
कोण विचारिल आतां तुजला ?
गळति लागली तव सुख-स्वप्ना,
धरिसि उगी कां दुराभिमाना ?

पूर्वी जनतेच्या डोक्यावरि,
पडणें आतां पायांखालीं,
जो तो तुडवित नकळत खालीं,
उंच करुनि जणुं ताठर माना
धरिसि उगी कां दुराभिमाना ?

ज्या फांदीच्या आधारानें
आनंदानें झोके घेणें,
तिनेंहि आतां तुला विसरणें,
रीत जगाची असली, पर्णा,
धरिसि उगी कां दुराभिमाना ?

त्या फांदीवरि परि चढण्याची
ताकद नाहीं तुझ्या तनूची,
वाट पाहसी तूं कवणाची ?
कोण न त्राता, पिंपळपाना,
धरिसि उगी कां दुराभिमाना ?

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 24027 वि: 3104
क्रमांक 9832 नों: दि: 24-1-98

*

१६-५-१९४९

# अं त र — १

माडांच्या कुशींत
झोपड्या झोंपल्या
कुशीला घेऊन
दरिद्री जीवन !

तयांच्या कुशींत
सानुलें जीवित
झोंपलें सुखांत
निश्चित, निवांत !!

पल्याड पांदीच्या
टेकडीवरतीं
प्रकाश विजेचा
उंचशा महालीं !

तिथें तडफडें
विलासी जीवित,
जागतें दुःखांत,
जागतें चिंतेंत !!

१-११-१९५३

*

## ते बंडखोर हो मोठे ठरले

ते बंडखोर हो मोठे ठरले
फांसावर जे विहसत चढले. ॥ धृ० ॥

हृत्सिंधूमधिं ऊर्मि उसळल्या,
रुधिरांच्या अन् लहरिं खवळल्या,
दिशा तयांनीं पूर्ण व्यापल्या,
रिपूस ज्यांनीं निराश केलें,
ते बंडखोर हो मोठे ठरले.

मानव्याच्या मशालि घेउनि,
अंधारांतुनि मार्ग काढुनी,
मरणाला आव्हान देउनी,
दुजांस ज्यांनीं दूर फेकिलें,
ते बंडखोर हो मोठे ठरले.

फांसावरतीं चढतां चढतां
बोल मुखांतुन—'मरण शरीरा—
सत्य जगामधिं कथेल आत्मा'
लढतां लढतां अमर जाहले,
ते बंडखोर हो मोठे ठरले.

सभोंति तटबंदी चौफेरी,
गरजत मोठ्यानें रणभेरी,
बाळें नाचत त्या मंदीरीं,
लवांत ज्यांना छरे लागले,
ते बंडखोर हो मोठे ठरले.

सूडवृषावर स्वार बनोनी,
आत्मसंयमें दोर खेचुनी,
तप लोटियलें परदेशांमधिं,
शिंगें रिपुला रक्त माखिलें,
ते बंडखोर हो मोठे ठरले.

तो दिन स्मरणांतुन ना विसरे—
जालियनाच्या बागेमधले
पुष्पगुच्छ रक्तानें भिजले,
थडग्यांतुनि ते हंसतिल सगळे,
ते बंडखोर हों मोठे ठरले.

आज स्फूर्ति दे भगतसिंग
त्यागाचा अन् उद्यमसिंग
भयाण आक्रोशी रणशिंग,
उठोनि हे घ्या संगरभाले,
ते बंडखोर हो मोठे ठरले.

स्वातंत्र्याची बाला डोले,
या, या, हासत नाचत सगळे,
मांगल्याचा दिन हा उगवे,
बंडखोर अम्हि ठरुंया बाळें,
ते बंडखोर हो मोठे ठरले.

२१-२-१९४४

*

## गो फ ण वा ली स—

भिरि भिरि, भिरि भिरि भिंगरिपरि कां बसूनि माच्यावरी,
मारिसी गोफण माझ्या उरीं ? ॥ धृ० ॥

कां घमेंड पोरी अवखळ करिसी उगी ?
मज माहित मिळतें हांजीनें पोटगी,
जमतील पांखरें जोंवर असतें सुगी,
परी संपतां सुगी ज्यानिची जातिल पळुनी दुरी,
सोडुनी तुजला माळावरी.

बघ रानपांखरें अधरावर बैसतीं,
तव पुष्ट उरोजांतील मधा हारितीं,
जणुं भाटासम अन् क्षणभर तुज वानितीं,
स्तुतिसुमनांच्या भाराखालीं वाकुनि उंचीवरी
धरिसि कां गोफण उजव्या करीं ?

मी नसे पाहुणा कुठल्यातरि देशचा,
मी असे जाणता सौंगडि या रानचा,
मी राखणदारच आहे तव ज्यानिचा,
परि रोष धरुनि कां भिरि भिरि भिरि भिरि बसूनि माच्यावरी
मारिसी गोफण माझ्या उरीं ?

२९-११-१९४८

*

## सा ग रा--

कुठें तूं सागर, कुठें मी विहार,
दृष्टीपुढें तुझ्या भान नुरे.
अस्मान-भरारी मारीतात घारी,
तुझ्यापुढें त्यांचा गर्व नुरे!
राष्ट्रोद्धारचक्रीं कवित्व तुझेंच!
मातृगीत गाच मजलागीं!
संतमालिकेंत ज्ञानेश्वर बाल,
रेड्यामुखीं वेद वदवीला!
बालकवी तूंच मायदेशामधीं,
अंतरीची स्फूर्ति अलौकिक.
आईचेंच गीत मार्गावरी गात,
अमर मृत्यूस केलेंस त्वां.
तुरुंगाच्या द्वारां गीत गाईलें त्वां,
झंकार तयाचा कर्णीं माझ्या.
जीवन-खाईंत भाजून निघालों,
मायभूमीलागीं काय करूं?
अंतरीची ओढ राष्ट्रोद्धारासाठीं,
रूढीच्याच गांठीं बांधलों म्यां.
भाग्य-सूर्य तुझा दिपवील जगा,
मिळे सिंहासन तेंवी तूज.
विनती हे कवे, पामरावरी या
दयामृतधारा वाहूं द्याव्या.
सागरा, ही वांछा- फूल नसें जरी,
पाकळ्यांच्या परी सेवा घडो.

७-६-१९४३

*

## म हा त्मा

महात्म्या, तुझी दिव्य तेजस्वि मूर्ती
मना मोहवीतें शरीराकृती,
मनोमंदिरीं देविंतें ठेवुनीया
पुढें लावुनी नेत्रनीरांजनांना—

—जधीं आळवीसी तितें शांततेनें,
हसे आंतल्या आंत संतुष्टतेनें,
तिचें हास्य वोंसंडि त्वद्‌माल्यवाटें,
निराशी मनाला दिसे मार्ग तेथें.

कुणी बांधिली देहयष्टी तुझी ही ?
नसावाच तो मानवी शिल्पशास्त्री !
विजेमाजिं जें तेज ना सांठवीलें,
तूझ्या नेत्रपेटींत तें ठेवियेलें.

मनोहारि श्रीकृष्ण जो गोकुळीचा,
तुझ्या यष्टिं या कांतिचा त्याच सांठा,
अहिंसा–दया–शांति–सत्यत्व–देवी,
तितें सेवण्या यष्टि तूझी झिजावी.

तनू चंदनानें, कृतींच्या फुलांनीं
तितें तोषवीसी महा आरत्यांनीं,
जगन्मंदिरीं आज देवत्व आलें—
तुला सेवण्या संत दूरूनि आले.

गरींबींतलीं घाण अन् म्लान पोरें
त्वद्राउळीं संत मोठेच हे रे !
तयांनीं फळें आणिलीं जीं मनानें
दुजाराम सेवीसि आत्मीयतेनें.

बहू वानिता वानिता त्वन्महीमा
थकोनीच जाईल मद्वैखरी गा !
महात्म्या, जगीं वंद्य तूं एकला रे !
तुझा दास हीं अर्पितो शब्द पुष्पें.

१६-७-१९४४

*

# स खे--

सखे, तुझ्यास्तव ज्ञान द्यावया झालों मी मास्तर
'बी. ए., बी. टी.' डिग्री मिळविलि नानाविध सत्वर,
तुझ्या हनूवर गुंफियल्या मी काव्यपुष्पमाला
तव प्रीतीस्तव पाकिटांतुनी अर्पियल्या तुजला.

सखे, तुझ्यास्तव गाणें गाया बनलों मी गायक
'गान-प्रवीण' पदवी मिळविलि बनूनि पायीक,
नव सारंगीवरी गायिले रागावर राग
उन्मळूनि ये कंठीं माझ्या नित्यच अनुराग.

सखे, तुझ्यास्तव रंगभूमिवर झालों मी ॲक्टर
'अभिनयपटु' ही पदवी मिळविलि बनूनिया किंकर,
गेल्या वर्षी जेव्हां झालें वार्षिक सम्मेलन
तुझ्याकडे पाहून घेतलें हीरोचें काम.

मला वाटलें इतुकी सेवा फळास आजि आली,
हाय! परी गे! 'नको तुम्ही मज' नोटिस ही दिधली!!

१९-६-१९४८

*

# आ गी न गा डी

झुक झुक, झुक झुक
आगीनगाडा चालला रं ॥ धृ० ॥

अंधार आला, झोंपवि सकला,
वाराहि येऊन् लागे गायाला,
दिवे विजेचे जणूं काजवे,
अंधार-चाकळीं झोंपत सगळे
परंतु चेटकी आगीनगाडी
मशालि घेउन् चालली रं.

बंबाड्या भूताची बायको पिर्तिची
कोळसे खाउन् नि पाणी पिउन्
घेउन् चाले पोरांचें ओझें
काळजाचे दिवे लावून रं.

शिटी फुंकित्, खडाड् करित्,
ध्येयाचें गाणें मंजूळवाणें
आनंद द्याया मुलांस अपुल्या
गात गात नी डोल डोलुनी
कार्याच्या रस्त्याला चालली र.

कड्यावरुन् कांटयांवरुन्,
ओढ्यावरुन्, नदीवरुन्,
डोंगरावरुन्, बोगद्याखालुन्.
वाटेंत कशाची भीती न बाळगुन्
ध्येयाच्या मार्गानं चालली रं.

झुक, झुक, झुक झुक
आगीनगाडी चालली रं.

८-१०-१९४४

*

## ये ललना

ये, लचकच लचकत ये ललला,
अन् अविरत नर्तिनि रिझवि मना. ॥ धृ० ॥

पायीं पैंजण, हातीं माला,
करकमलांचा करूनि चाळा,
झणि मोहवि सकला रसिकजना,
ये, लचकत लचकत ये ललना.

सप्त सुरांची साथ द्यावया
तरंग उठती जळीं लीलया,
रंगभूमि रिति कां मग ललना ?
ये, लचकत लचकत ये ललना.

सुरम्य सारुनि पदरा दूरी
दौलत दाखिव उरिची न्यारी,
सखि, मंत्रमुग्ध करि श्रांत जना,
ये, लचकत लचकत ये ललना.

१५-११-१९४७

*

# एक दृश्य

झप झप पाउल टाकित टाकित
ऑफिसमार्गें मार्ग आक्रमित
अकरा वाजुनि गेले म्हणूनि
हृदयाचे मम ठोके मोजित
चाललों भरार.

परंतु मार्गीं थांबलोंच मी,
चक्र जाहलों दृश्य देखुनी—
पाटी झळके माडीवरतीं
'वकील आंत,' नि 'एल्. एल्. बी.' ची
डिग्रि दिसे मजला.

लगतच होती खिडकी एक,
दार नि उघडें होतें अर्ध,
खुर्चीवरतीं होते कोणी—
दिसे चेहरा, रंग गुलाबी
अंधुकसा मजला.

सूट बुटांतिल व्यक्ती कोणी
क्षणामधींया आली दमुनी—
कपोल चावुन केला उष्टा—
'दृश्य' नि वदली ती कलिका—
दिसलें मजला हें.

तसाच आला तो बाहेरी,
ती होती परि खुर्चीवरतीं,
नजर द्वयांची भिडली मजशीं,
लज्जित होउनि त्या दोघांनीं
झाकिलीच खिडकी !

क्षणभर थांबुन विचार केला—
' प्रिया कुठें मम ? जिणें कशाला ?
पृथ्वि नसे जर, रवी कशाला ?
खिन्न मनीं !—पण बाराचा
ठोका तर पडला !

काळीजाचें पाणी झालें,
देहभान अन् अंगीं नुरलें,
पळत चाललों ऑफीसाला,
जुमानिले ना घर्मबिंदुला,
अन् पोंचलों स्थळाला.

साहेब नव्हते परि आलेले
नांव जयांचे हो ' काळेले ',
सही करोनी डायरीवरी
बसूनि मी मम जागेवरतीं
विचार बहु केले.

२४-७-१९४४

*

## घट भरले माझे

घट भरले माझे मधु मदिरेनें
मनिं विहसत येउनिया मदनानें ॥धृ०॥

जीवन अपुलें मरुसीरेतपीर
खिन्नताच जी वसे अंतरीं
सोडाया तिज या मम दारीं,
मी शमविन हृदयें मधुबिंदूनें,
घट भरले माझे मधु मदिरेनें,

ग्रीष्मर्तूचा ताप जाहला—
असेल कोणा या वेळेला,
तर सांगा त्या तृषित हृदाला---
'घट भरले येथें मधु मदिरेनें
मनिं विहसत येउनिया मदनानें.'

या कोणीही मौज कराया,
सुखसाम्राज्यें क्षणिं निर्माया,
दसऱ्यांतिल ही दौलत लुटण्या,
देईन मदीरा मी ममतेनें,
निर्मीन निमीषीं स्वर्ग सुखानें.

११-१-१९४९

*

## कांहीं कणिका

(१)

जी भव्य कलाकृति अमर जगीं या ठरली,
ती शहाजहांनें प्रियेलागिं बांधियली;
        ते कलावंत परि अमरकृतीनें मेले,
स्वार्थास्तव बोटें छाटियलीं हो ज्यांचीं,
नांवें त्यांचीं कुणि कधिं का काढियलीं ?

× × ×

(२)

अंगार पसरला सभोंति माझ्या आज,
भ्रष्ट मनें जन वाजवीति परि झांज;
        या अबलेला अंगारांतुन काढाया
धजेल कोणी का करण्या बलिदान ?
देतील देवता स्वर्गीं त्याला मान !

× × ×

(३)

यामिनी धावते हुडकण्यास सूर्याला,
संदेश पाठवी विहगासंगें त्याला,
        सुमुहुर्तानें रंगविती द्वय गाल;
भास होतसे मीलन हो जणु त्यांचें,
हाय, परंतू अंतर दोन ध्रुवांचें !

× × ×

( ४ )

बघ धैर्यमेरु ते बंदीखान्यांतून
बहु रुधिर वाहतें ज्यांच्या चोंचींतून
कृश पंखें फडफड करीत दूर निघाले
जणुं एक मनानें धांवत अरुण दिशेला,
परि काय करावें अमुच्या तिन्हिसांजेला ?

× + ×

( ५ )

बांधतो मनीं जन सुंदरता–राऊळ,
मूर्तीला स्थापुनि गाइ गान मंजूळ;
बहु भक्तिभावें समाधिस्थ तो होतो,
लव पुरें, येतसे परिस्थितीचा जाळ !

× × ×

( ६ )

धनदौलत मजला नको नको ती तुमची,
मज नावडतें श्रीमंती जी विक्रीची;
बहु आहे बळकट अजून माझा दंड,
भाकरी श्रमाची सुखवीते आम्हांला,
आणून पोंचवा येथें माझ्या बाळा.

*

१८–१२–१९४४

# दि शा–दि शां ना दी प ला ग ले

दिशा–दिशांना दीप लागले,
मंगलमय हें त्रिभुवन झालें. ॥ धृ० ॥
सुमा–सुमांतुनि जीवन भरलें,
हरितांबर अवनीनें ल्यालें,
मंद समीरण मोदें डोले,
आमोदें मन प्रसन्न झालें.
खळ्या–खळ्यांतुनि ढीग धनाचे,
वैभव दिसतें वनराणीचें,
जीवन जणुं तें शेतकऱ्यांचें,
नाचति तेथें कृषिवलबाळें.
संघटनेचें जाळें विणुनी,
अमृतकण चोंचींत घेउनी,
मंजुळ गाणीं गात गात नी,
घराकडे द्विज परतुं लागले.
घरां–घरांतिल दीपज्योती
स्वबलिदानें जगता देती
मंद मधुरसा प्रकाश, शांती
कृत्रिमता तेथें न आढळे.
निशिकांताच्या राज्यामधल्या
आवलि जीवनमय ज्योतींच्या,
पाहुनि पणत्या अन् भूवरच्या,
स्थितप्रज्ञ मम मानस झालें,
मंगलमय हें त्रिभुवन झालें.

१६–१०–१९४८

*

## से व का ची श्र द्धां ज लि

पहा पहा ती नभःप्रांगणीं बापूंची मूर्ती,
पहा पहा ती कडेकपारीं देवाची मूर्ती,

पहा ठेवुनी खांद्यांवरतीं बालांच्या हात,
येत स्थळिं प्रार्थाया देवा, परि झाला घात!

छरे लागले छातीमाजीं, अरुण लाल झाला,
'हरे राम', ही वाणी ऐका, 'क्षमा करा त्याला!'

कोण वदतसे–'देवा घरला गेले गांधीजी?'
आसुपूर कां वाहविसी जन नयनसिंधुमाजीं?

दिसतो मजला सत्यात्मा तो अणुरेणूमाजीं,
सहज आदरें लवतीं गात्रें तत्पुढतीं माझीं.

पूज्य पिताजी पहा बैसुनी ईशस्तुतिसाठीं,
मंजुळ नादें भगवद्गीता शांततेंत गाती.

हसतमुखानें धडे शिकविती सकलां सत्याचे,
विश्वबंधुता, संयम, एकी, प्रेम, अहिंसेचे.

शब्द मुखांतिल, छेः हो भारी मूल्यवान् मोतीं,
प्रसाद सेवुनि पुण्यात्म्याचा दीन शांत होती.

पहा, पहा आजानुबाहु ते राम नभीं हसले,
गांधीजींच्या रूपानें या युगांत अवतरले.

परदेशामधिं ख्रिस्त येउनी कार्य करुनि गेले,
भारतांत जरि धर्म शिकवुनी गौतममुनि गेले,

गांधीजींच्या सम परि कलियुगिं गांधिजाच झाले,
त्यांच्या तेजापुढतीं पापात्मेंही बहु भ्याले.

बापूंचा जरि देह चंदनीं भस्मिभूत झाला,
अमर तयांच्या त्रैलोक्यामधिं तत्त्वपुष्पमाला.

त्या तत्त्वांमधिं दिसतिल सकलां बापू ममताळू.
एकलव्यासम तत्त्वासाठीं व्हावें कष्टाळू.

× + ×

बापूजी हो सेवक तुमचा मी दुबळा द्वाड,
अर्पितसे सु-मनें श्रद्धांजलि, घ्या करुनी गोड !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 90446
संदर्भ शाखा (अचल प्रत)

१५-१२-१९४८

*

# या मि नी  गे--

यामिनी गे, ये जराशी राज्य तूझें चालवी,
रविकरांनीं दग्ध झाल्या मानसाला शांतवी.

दीन दुबळ्या अर्भकाला दे कुशीचा आसरा
दुग्ध कुंभांतील पाजुनि पुष्ट करुनी त्याजला,
गोड अंगाई म्हणोनी वायु-हिंदोल्यावरी
तारकायुत दुलइ घालुनि उर्वित त्याला झोपवी.

पथिक ध्येयाप्रति निघाला, घाव बसले अंतरीं,
रुधिर वाहे, भूक लागे, ताहनेनें व्याकुळी;
चालला परि मुक्तिसाठीं, सांज झाली त्या क्षणीं,
दे विसावा त्याजला गे, तन्मनाला हासवी.

दरिद्रानें किति श्रमावे जीवनार्थी आजला,
पूर्वजन्मीं पाप केलें काय त्यानें, सांग ना !
अमृताने धुंद करुनी दे विसावा त्याजला
जवळि घे आई तयातें, याचितो गे हा कवी.

५-१२-१९४३

*

## माझें घर

माझीया घराला कुडाच्या गे भिंती,
नाहीं सीमेंटाच्या रंगदार उंची.
माझीया अंगणीं पांखरांची शाळा,
नाहीं सुवर्णाच्या पिंजऱ्यांच्या माळा.
माझीया दारांत तुळसीचा थाट,
नाहीं सोनचाफा सुगंधानें युक्त.
माझीया ओव्यांत भरल्या कणगी,
नाहीं तिजोरींत रुपयांच्या राशी.
माझ्या माजघरीं वाकळ-बिछाना,
पलंग रुप्याचा नाहीं विसाव्याला.
स्वयंपाकघरीं माझ्या उतरंडी,
दाग-दागिन्यांनीं नाहीं भरलेली.
माझ्या देवघरीं तेवी सांजवात,
विजेच्या दिव्यांचा ना लखलखाट.
माझ्या परसांत भारावल्या केळी,
नाहीं लावियेल्या विलायती वेली.
माझीया गोठ्यांत हिऱ्या-मोतियांची—
जोडी शोभतसे, खूण वैभवाची
माझीया घरांत नांदे सदा सुख,
परी अंतरांत एक असे भूक.
येशील का सखे तिज शमवाया
सदनीं माझीया स्वर्ग निर्माविया ?

५-१-१९४८

*

# अनाथ मी सरकार

शूर शिपाई अनाथ मी सरकार ! ॥ धृ० ॥
स्वातंत्र्यास्तव मायभूमिच्या
रात्रंदिवसा झिजविली काया,
प्राणांचा दिधला नि हार.
उगवे दिन अजि सौभाग्याचा,
कुंकुमतीलक शोभे रविचा;
पायिक परि हा लावित वार.
भीक मागितो सेवक आजीं
लावुनि झोळी काखेंमाजीं
पोटासाठीं दारोदार.
त्या वेळेला हार घातले—
शिरिं माझ्या, अन् स्वागत केलें;
आज परी कां करितां ठार ?
नको नको मज हार सुमांचे
बेगडि तुमच्या या प्रेमाचे,
फेकुनि द्या तो सुमसंभार,
मज कोणी हो नोकरि द्या ना !
अन्नाला लावा या दीना,
शूर शिपाया द्या आधार.
शूर शिपाई अनाथ मी सरकार !

९-११-१९४७

*

## डोंबाऱ्याचा पोर

डोंबाऱ्याचा पोर बांधतो भरारा दोर ॥ ध्रु० ॥

करील सर्कस आनंदानं जाळाया तें पोट,
तापत हैतीं केंस तयाचं कुरळं काळं भोर.

कपडं कुठलं अंगावरतीं ? कमरेला लंगोट,
कष्टानं अन् जालं हाये शरीर काळं भोर.

पोलादाची कांब तयाची, येइ तियेला बांक,
चेंडु उडवा वाटेल तस्सा, जाइल वरती फार.

चेंडु कशाला, पाटा पायजे चटणी वाटाय् काय ?
मिंटामध्यें अंगाचा ह्यो करील कीं तैयार.

दोरावरतीं चढून चालल् एका पायानं,
करील नाना खेळ ठेवुनी काठीवरतीं भार

सिरमंतीचा थाट कशाला ? मानुसकीला फांस !
कोंडा भाकर, नीर झऱ्याचं पुरंल हा आहार,

गरिबांनो, द्या पोटामधला काढुनि गरिबा घास.
दाहि दिशीं नांवाचा तुमच्या करील जयजयकार.

१२-१२-१९४३

*

मराठी ग्रंथ(संग्र)हालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 2.40.29..... दि: ...2/64.......
क्रमांक ... ... नों. दि. 25/5/68

# अखंड कार्य करी

मनुजा, अखंड कार्य करी. ॥ धृ० ॥

जन बहु येतिल, जन बहु जातिल;
कुणि तुज वानिल, कुणि जरि निंदिल
कल्याणचा भाव धरी.

किति निर्झरिणी दाहि दिशांनीं
नद्यांत मिळुनी, विलीन होउनि,
दुरूनि येती सिंधुपरी.

प्रेमळ चिमणी कणा-कणांनीं
जगतामधुनी चारा आणुनि
निज पिलांस बहु ऊब करी.

किति सानूलें बीज, न दिसलें,
किति मोठाले वृक्ष जाहले!
विहग नाचती तयांवरी.

कार्याच्या तूं गाडींतूनी
संयम-धीर-वृषांना हाकुनि
दास्यावर त्वेषानें चालुनि
स्वतंत्रतेला मुक्त करी,
मनुजा, अखंड कार्य करी.

२३-२-१९४४

*

# अद्वैताची ओळख

मज हारपलेलें सांपडलें,
　　　　स्वर्गसुखाचें दार उघडलें. ॥ ध्रु० ॥
मृदुल करांचा विळखा पाहिला
कमलदलासम जणूं भासला,
रोमांचानें देह विनटला;
　　　　मनमाझारीं मंदिर सजलें,
　　　　देवभक्त अन् क्षणांत बनलें.
त्यांच्या माझ्या रूपामाजीं
विचार आणिक रीतीमाजीं
नांदे समता ध्येयामाजीं—
　　　　पूर्वजन्मि जें सुकृत केलें,
　　　　त्यांच्या रूपें फळास आलें.
अज्ञातीं जें दडलें होतें,
कितीक वर्षें शोधित होत्यें,
लावुनि हृदयाच्या पणतीतें,
　　　　कष्टानंतर आज गवसलें
　　　　होतें जें तें श्रेय हरपलें.
सूरामाजीं सूर मिसळलें,
द्वैत जयांचें दूर पळालें,
संसाराचें गान प्रगटलें,
　　　　समाधिस्थ जणु सदन जाहलें,
　　　　शंकरतनुनें सुख मज दिधलें.
आतां आशा नसे कशाची,
अखंड तेवत राहो पणती
जीवनमय मंगल ज्योतींची,
　　　　सागरिं नौका हळुंहळुं डोले,
　　　　सुखसंचालन नित्य चाललें.

७-७-१९४९

*

## दीप लावियेला

जुन्या कल्पनांचा समाजीं कचरा,
तया पेटवाया दीप लावियेला.

सुवर्णाचें नाणें घाण भेसळीनें,
शुद्ध करावया कुंड पेटवीला.

सत्व-दीपावरी 'तमाची' काजळी,
तिज फुंकराया श्वास सोडीयेला.

अज्ञान-तिमीरीं चुकलेल्या जनां
सुपथ दावाया दीप लावियेला.

देशाभिमानाची ज्वाला विझलीया,
तिला चेतवीण्या दीप लावियेला.

निराशा-वनांत युवक विषण्ण,
आशा दाखवाया दीप लावियेला.

वादळ-भीतीनें तारका पळाल्या,
अंधार नष्टाया दीप लावियेला.

निराशांधःकारीं सिंधूमाजीं नौका,
तीर दाखवाया दीप लावियेला.

प्रतिभा-चिलीमीं अक्षर-तमाखू,
रस धूमवाया अंगार ठेवीला !

*

८-५-१९४५

## र त्न-ला भ

रत्न मज दिव्य आज लाभलें,
हृदयकोंदणीं त्यास बसविलें. ॥ धृ० ॥
त्या तेजानें मार्ग उजळला,
प्रेमफुलांचा सडा पसरला,
उद्यानांतुनि पुढें चाललें,
रत्न मज दिव्य आज लाभलें.
जातां जातां दीन भेटले,
दिव्य तेज तें तयां दाविलें,
त्यांना संगें पुढतीं नेलें,
रत्न मज दिव्य आज लाभलें.
आणि भेटलें जीव सानुले,
तयांस सुद्धां सवें घेतलें,
पुढतीं पुढतीं पद टाकियलें,
रत्न मज दिव्य आज लाभलें.
संतांचा मेळावा जमला,
कीं देवांचा वास जाहला,
परमेशाच्या गृहा चाललें,
रत्न मज दिव्य आज लाभलें.
अंधाराचें राज्य संपलें,
तेजोमय हें विश्व जाहलें,
ह्यांतच मीपण जळुनी गेलें,
रत्न मज दिव्य आज लाभलें.
तेज, तेज, हें तेजच सगळें,
सत्य आणि शिव, सुंदर झालें,
ओंकारामधिं विलीन झालें,
रत्न मज दिव्य आज लाभलें.

२-६-१९५३

*

# ल ग्ना नं त र

( कविवर्य ग. दि. माडगूळकर यांची क्षमा मागून )

लग्नानंतर काय घरामधिं
राज्य नांदणें प्रीतीचें ?

लग्नानंतर शिकले जातिल
काय धडे अन् नीतीचे

लग्नानंतर नंदनवन का
होइल अवध्या सदनाचें ?

छेः, छेः, नाहीं; लग्नोत्तर मग
प्रयत्न दुसऱ्या लग्नाचे !

*

२३-४-१९४४

# वसंतागमन

मधुकर फिरती वनावनाला,
वसंत नाचे दिशादिशांला.

जुन्या बिजाला नवी पालवी,
वृक्षलता अन् शिर झुकवींती.

प्रिया पहुडली मखमालीवरि
धांवत येई प्रियकर दारीं.

कुहुकुहु कोकिल, भारद्वाज नि
विठू विठू ही पोपटवाणी;

आकाशाचीं बाळें सगळीं
स्वागत करण्या सुसज्ज झालीं;

लता लपविती फुलांस अंकीं,
सानुलिं सुमनें कुणास देखितिं ?

मधुकर येतां मधु ओतीतीं,
जणुं स्वर्गाचे झरे वाहती.

इथें कुणाचा नाहीं भेद,
मधू गळतसे यांतुन गोड.

मिळून जाऊंया स्वर्गाला,
वसंत नाचे दिशा-दिशांला.

*

१९-४-१९४४

## का ळी जा चा  का गु द्

देइल् कुणि का हो माझ्या लाड्क्या मुला
काळीजाचा माझ्या कागुद् बघायला ?

भरलेल्या कणसांचे दाणे जसे,
लाडक्याचं रूप माझ्या हाये तसें,

पर मला सोडुन् राया कसा गेला
भर्ती होउन् लष्करांत लढायला ?

भरलेलं घर व्हतं जवा व्हता,
मसणाची कळा आली त्येला अतां;

तुळस् लागूली अंगणांत कर्पायला,
समजेल त्येला कसं ? सांगा मला.

पृथिवीच्या पाठीवर कुठं गेला ?
अवकाश आतां किती पर्तायला

लिहाल् कोणी का हो त्येला पर्तायला—
'आई खिळ्ली आजारानं हंत्रुणाला' ?

देइल् कुणि का हो माझ्या लाड्क्या मुला
काळीजाचा माझ्या कागुद् बघायला ?

*

१०-११-१९४४

## अ खं ड भा र त खं ड

अखंड भारत खंड,

अमुचा

अखंड भारत खंड. ॥ धृ० ॥

परकीयांनीं प्रयत्न करुनी जरी पाडिले खंड,
अखंड भारत सदा राखण्या सांडूं रक्त उदंड.

भोळिं लेकरें मायभूमिचीं, थोपटतीं ना दंड !
अमृत पाजियलें सर्पाला, म्हणून काढी खंड.

आम्ही नुरलों आज दुजांचे रक्षक साधू थंड !
संजीवानिनें खल दंडाया निर्मूं आग प्रचंड.

धेनु आमुची जगत्संस्कृतीखाण असोनी थंड,
म्हणून यंत्रें दूध संपतां रक्त काढि पाखंड !

वीर बालकें शिवरायाचीं पुन्हां उभारूं बंड
येइल कुणि जर विभागण्याला अमुचा भारतखंड !

अखंड भारतखंड,

अमुचा

अखंड भारतखंड.

*

१२-३-१९४४

# शोध

एक चांदणी, दोन चांदण्या,
लक्ष चांदण्या व्योमांत,
पिंगा घालिति चंद्राभंवतीं
मंडळ करुनी प्रेमांत.

परी चंद्रमा पायपीट करि
दारावरुनी पृथ्वीच्या,
जाळें तेजोमय प्रेमाचें
टाकितसे तिज पकडाया.

पृथ्वीदेवी अव्हेरुनिया
शीतलरश्मी चंद्राला,
गिरक्या घालित धांव घेतसे
प्रेम दावण्या सूर्याला.

प्रेमदेवि परि रविची दडली
बुरखा घेउनि अज्ञातीं,
म्हणूनि धावे हृदया जाळित
अंध होउनी तो खांतीं.

असेल धावत प्रेमदेवि ती
अज्ञाताच्या मार्गानें
अज्ञातीं दडलेल्या अपुल्या
शोध कराया देवाचा.

*

२०-७-१९५१

# जाउं नको तूं दूर रे

जाउं नको तूं दूर रे. ॥ धृ० ॥
भरलें ओझें नउ मासाचें
तुझ्या नि माझ्या हें प्रीतीचें
सहन करितसे दिन दुःखाचे,
आधार जिवा तूंच रे.
नवरात्रींच्या नऊ दिवसांनीं
निघेल भानू दसऱ्याचा नी
उषामाइच्या जणुं उदरांतुनि
नाशिल रिपुतें तोच रे.
माध्यान्हीचा काळ श्रमाचा
पडेल पाउस जणुं काट्यांचा
सडा पडावा जरि रक्ताचा
मिळेल नंतर सूख रे.
नैराश्याच्या ह्या वस्त्रांना
टाकुनि, लेई आशावसना,
वाट देख, हाकारी सुदिना,
वसंत येइल छान रे.
देइल अमुचा बाळ अम्हाला
छत्री आम्राची शमण्याला,
वायुमिषें गाइल गाण्याला,
त्या दिनीं मुक्ती मिळेल रे.

*

८-४-१९४०

# एका क्षणाचा खेळ!

गडगड वाजें गगनांत,
        मयूर नाचे तोऱ्यांत,
        चकोर उडतो नादांत,
बाळ दुडदुडें बगिच्यांत.

×        ×        ×

कडकड तांडव विपिनांत,
        सिंह गर्जतो रागांत,
        गज चित्कारी त्वेषांत,
तेज बाळच्या नयनांत.

×        ×        ×

सर सर शिरवें शिमग्यांत,
        शांती पसरे शेतांत,
        भयाण वाटें मरुभूंत,
बाळ झोंपलें थडग्यांत !

११-१-४८

## कोण येणार?

सुधारणेचें पांखरूं आलें
पश्चिम दिशेनें फडफड करीत,
टोंच मारून जखमी केलें
पूर्व दिशेस लाल करीत.

उदयविहार म्हणत म्हणत
काळोखाची वाटचाल केली,
गिधाडांच्या तावडींत सांपडून
उदयगिरीची माती केली!

ग्रस्त झाल्या पूर्व दिशेस
कोण येणार उजळून टाकण्यास,
काळोखाच्या मगरमिठींतून
मानवतेला मुक्त करण्यास!

*

२४-२-१९५७

## ये रविराया

सौख्याचें साम्राज्य निर्मिण्या
जगत् तलावरि ये रविराया. ॥ धृ० ॥

रम्य उषेच्या पंखावरुनी
विहगसुमांच्या दोल्यावरुनी
सप्तरंगि वा अश्वावरुनी
डोलत डोलत ये रविराया.

तंतूवाद्यें पवनिं वाजतीं,
द्विज जमुनी त्या तालावरतीं
नवकवितांचें कूजन करिती,
सकल सुसज्जित स्वागत करण्या.

कटोह भरला काठोकाठ
मधुमदिरेनें सुवर्णमिश्रित,
काव्य श्रवणाच्या नादांत
येइ भराभर प्राशन करण्या.

कुबेरभांडारांतिल लुटुनी
सुखसंपत्तीसंग्रह श्रमुनी
सहस्ररश्मी-पिचकारींतुनि
पसरी पृथ्वीवरतिं लुटाया.

सोनीयाचे कर पसरूनी,
अवनीला आलिंगन देउनि,
उदासीनता तिची नाशुनी,
लाग सुखाचें कार्य कराया.

*

२६-१०-१९४८

## अं त र-२

आईची माया जणुं चंद्राची साउली,
पिताजींच्या प्रेमें होई सूर्याची काहिली.

आईची माया जणुं लिम्लेटाची गोळी,
पिताजींचें प्रेम परी किनाईनची गोळी.

जधीं मी रडतसे आई घेई जवळी,
पिताजी दावितात दोन हात करोली.

आईची माया जणुं पिकलेलें मुसुंब,
पिताजींचें प्रेम परी आंबट कवठ.

आईची माया जणुं पोळींतील पुरण,
पिताजींचें प्रेम परी डाळीचें वरण.

जधीं मी गाणें गाई आई मज साथ देई,
पिताजी चोरूनीया दारांतून ऐकीती.

आईच्या मायेमुळें घरांत वाढलें,
बहिर्जगांतील मार्ग पिताजींनीं दाविले.

आईच्या मायेला मी विसरीन कैशी ?
लीनतेनें वागीन मी नेहमीं पित्याशीं.

देवा, देई उदंड आयुष्य दोघांना,
पहावें हयातींत त्यांनीं नातवांना.

*

१५-१२-१९४८

# आ रा ध ना

धस्सकन भिवुनीया काळीज कांपतें,
प्राण कंठीं येवुनीया पांखरुं तडफडतें.

सूर्य आभाळांत, पण अंधार भासतो,
अस्मानांत धडाक्यानं वारा नी वाहतो.

वीज कडाडते भारी, वळवाचा नी पाऊस—
नेई त्यास्नी वाऱ्यासंगं, नाहीं मायेचं माणूस !

क्षणामधीं अंधःकार राज्य नी चालवी,
काळभूतें जमुनीया धिंगाणा घालीतीं.

रविराय गेलं कुठं, नाहीं काळजाचं कोणीच,
आब्रूनं कसं जगूं—ध्यास लागला मज हाच.

येक व्हता पोटीं गोळा, नऊ मास म्या वाढवीला,
गिधाडानं येवुन्शानी दुरीच नेईला !

वाड्यामंदिं माज्या होतं भरलेलं व्ह कणीस,
बुरकुंड उकिरड्यांत, टाकीति घाणीस.

भिंती होत्या आंबिलीच्या, पडून गेल्या,नी
तण वाढलयं जोरांत, आक्रोशि सिंव्हीणी !

कशी जगूं जंगलांत एकटी भयाण ?
येई देवा लवकरी, दावीव चरण.

हृदयाच्या पांखराला दावीव माहेर,
तुझ्या सेवेमाजीं सांडो जिवाची अखेर.

मांगल्याची मूर्ति तुझी दिसेल केव्हां रे ?
अरण्याचें राऊळ बनेल कधिं बा रे ?

वैराग्याचें सूख लाभों, विनति हे देवा,
नाहींशा होवो माझ्या खंतीच्या जळवा.

*

३०–७–१९४४

## घरीं पाळणा हलूं लागला

घरीं पाळणा हलूं लागला,
डुलूं लागल्या झुंबर-माळा. ॥ धृ० ॥

पांखरुं चिमणें चिव चिव करितें,
जणुं देवाचें गान प्रगटतें,
चोंचींतुनि वा सरिता स्रवते,

आनंदाची भरती हलवी
आईच्या अंतःकरणाला.

मुठी वळवुनी क्रीडा करितें,
चम् चम् चम् चम् चरण हलवितें;
मुखांतुनि शिव-हास्य दावितें,

मुके पटापट घेउनि माता
बालक अपुलें दावी सकला.

भालावरि टिकली चंद्राची,
नयनीं शोभा ये ताऱ्यांची,
गालांवरतीं कांति उषेची,

प्रकाश देण्या घरास सगळ्या
सदनीं या जणुं रवी उदेला.

*

२-२ १९५१

## ऋण

जेव्हां होतों मी सानुला
दूध पाजिलें मजला कोणी ?
खूप खेळणीं दाव-दावुनि
खेळविलें कुणि मज चुंबोनी ?
प्रहर प्रहर मज छातीवरतीं
निजवित होते कोण थापटुनि ?
कधीं मांडिच्या दोल्यावरतीं
मृदुल करांनीं झोके घालुनि ?

जेव्हां मजला न ये चालतां
चालविलें कुणि करास धरुनी ?
इतुकें कोणी कष्ट करोनी
मोठें केलें घास घालुनी ?
सुंदर शिक्षण कोण देतसे
चिउमाऊच्या गोष्टी सांगुनि ?
मोठ्यानें मी जधीं रडतसें
शांत कारितसे कोण धावूनि ?

बहुविध करिते प्रेम मजवरी,
कसा तियेचा विसर पडावा ?
कुडींत जोंवर राहिल प्राण,
करीन जप मी तिच्या गुणांचा.

*

८-१२-१९४८

# मानवी विश्व, तो आणि ती

सोनीयाची किनार चमके
आकाशांतिल अभ्रांची,
व्योमसागरामधूनि चाले
ज्योतिर्नौका नवलाची.

कुणी चालला बसूनि तीवर
राजा डौलांत,
सांगत होता कांहीं गमती
सखिच्या कानांत—

" असेल कैसें विश्व खालचें
मानव प्राण्यांचें ?
असतिल तेथें का सखये गे
झुंबर जलदांचे ? "

" नाहिंत तेथें, " सखी म्हणाली,
" झुंबर जलदांचे,
असतिल परि रे माझ्या राया
झुंबर दगडांचे. "

" रसिक खरी तूं, परी पूसतों
प्रश्न एक ऐसा—
विचार यात्रा परि दगडांचा
मनांत तव कैसा ? "

खुदकन् हसली राणी त्याची,
आणि बोलली झोकांत—
" दगडापाशीं बसून यावें
अन्य काय रे ध्यानांत ? "

*

८-१२-१९४८

# पां ख रा–

जीवित भंगुर म्हणुनि पांखरा
कर विहार पुष्पीं विहगवरा. ॥ धृ० ॥

सप्तरंगि कर सहस्ररश्मी
पसरी पृथ्वीवरतीं सुदिनीं,
रस प्राशूनी, पुष्ट होउनी
बघ रमत गमत निशिं जाइ घरा,
शिक याजपासुनी कला जरा.

आद्यंताची ओळख नाहीं,
वर्तमान चिरकालिक नाहीं,
विवंचना मग करिसी कां ही ?
गूढगुंजनीं मोद ना खरा,
घे सुमनांचा म्हणुनि आसरा.

ध्येयकल्पना अज्ञाताच्या
कशास जासी कवटाळाया
अंबरांत हे व्योमविहाऱ्या ?
वास्तवतेचा व्यवहार खरा
रे जिंकुनि जगतीं मिरवि तुरा.

जीवनसंध्या ये तुजजवळीं,
कलरव करतीं कुसुमें कवळीं,
आटुनि रस हो हिरवीं पिवळीं,
आलिंगन द्याया ये खघरा,
आकंठ पिउनि घे मधु मदिरा.

५–१२–१९४७

*

## गो विं दा ग्र जा स —

गोविंदाग्रज, येइ भूवरी, नाचूं प्रेमानें !
एकच प्याला प्रीत सेवुनी गुंगूया गानें ! !

पुण्यप्रभावें वसुंधरेच्या खलांस उजळूंया,
विषपेल्यांतुनि अमृतधाराप्रवाह वर्षूंया !

कल्पकतेच्या फुलांत हास्याचा मधु मिसळोनी
पर्णें काव्याचीं पसरावी दिशांत भृगांनीं.

तुझी बालिका हसतमुखानें जाई स्वर्गांत,
त्रिवेणिवेणी केतकिचें बन सुगंध पसरीत.

वाग्विजयाची तुझी पताका फडके जगतांत,
राजहंस बुडविल सकलांना अश्रूसरितेंत.

गुलाबि कोडें जादूचें त्वां घातिलेस सखिला,
सोडिव कोडें–'दिसेल केव्हां भाग्यभानु भूला?'

ये, ये, सखया डफ घेवोनी पवाड गाण्याला,
विनती एकच स्फूर्ति घेउं दे या सैनीकाला.

*

१०–१–१९४४

## एकच आशास्थान

एकच आशास्थान—
    ‘युनो’ हें

        एकच आशास्थान. ॥ धृ० ॥
            पावित्र्याची प्रभा फांकली,
            हिंसेच्या उदरांतुन आली—
            शांतीची जणुं कुंकुम लाली,
प्रेमळतेचें गान—
        चाललें प्रेमळतेचें गान.

            हिंसेचा तो नक्र भयंकर
            गिळूं पाहतो मानव सत्वर,
            मुक्तीसाटीं पसरी जो कर,
आलें भरभर यान—
        प्रभूचें आलें भरभर यान.

            ‘विश्व हेंचि घर मम’ समजोनी,
            मानवतेची मूर्ति सजवुनी
            मंदिरांत नव संस्थापोनी,
निर्मियलें हें स्थान—
        तयाचा आपण करुं सन्मान.

            मंदिरांत त्या मांगल्याचे
            दीप तेविती पावित्र्याचे,
            सुगंध तेथें आत्मोन्नतिचे,

परमेशाचें स्थान—
खरोखर परमेशाचें स्थान.

दास्याला ना स्थानच येथें,
हिंसेला ना वावच येथें,
पराक्रमाला बक्षिस मिळतें,

एकच शांतिस्थान—
जगाचें एकच शांतिस्थान.

मुनिनीं दिधल्या संदेशाला
'गीते' च्या तत्त्वज्ञानाला
मिळे मान विजयालक्ष्मीला,

एकच रम्यस्थान—
असें हें एकच रम्यस्थान.

नव्या पिढीला साथ द्यावया
एकत्वाचा मंत्र शिकविण्या
ज्ञानी बसले जे स्थानीं या

विनीत करुनी मान—
करितसे सेवक त्यांचा मान.

१५-१२-१९४८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 24029 दि: ...
क्रमांक ...9832 नों दि: ...

## समाधिस्थ आश्रम

नकोस बोलूं आतां सखया. ॥ धृ० ॥
शांत चंद्रिका, शांत नारळी,
जल नि लव्हाळी शांत ओहळीं,
पसरे शांती सभोंवताली,
उसळत ऊर्मी वैराग्याच्या,
नकोस बोलूं आतां सखया.
अनंतातुनी ये कांतीचा
झोत रुपेरी चिर सौख्याचा,
समाधिस्थ हो आश्रम मुनिचा,
स्थान नसें बंधास प्रीतिच्या,
नकोस बोलूं आतां सखया.
मूक पाडसें, हरिणी येथें
नमस्कारिती शांत मुनीतें,
विहग मानिती संदेशातें,
विसरे गोष्टी मी प्रणयाच्या,
नकोस बोलूं आतां सखया.
आज्ञा मानिन मी इथ मुनिच्या,
सेवीन प्रसादा संदेशाच्या,
सेविन ऊर्मी चिर सौख्याच्या,
जाइन जगतीं परमेशाच्या,
नकोस बोलूं आतां सखया.
बसते आहे समाधिस्थ मी,
भंगु नको रे मत्शांती झणिं,
ही विनती धरिशील का मनीं ?
जाईन अनंतीं क्षण राया,
नकोस बोलूं आतां सखया.

२६-१२-१९४४

*

## प्र भो–

प्रभो, तुझ्याबीण कठणें जीवन
होईना सहन मज आतां.

क्षणोक्षणीं येथें दुःखांची रे वाढ,
मीलनाची ओढ लागे तुझ्या.

सुखाची साऊली इतरांना द्याया
उगीच कां वाया शिणविली काया ?

ध्येयाच्या कल्पना उरीं बाळगिल्या,
शेख महम्मदी ठरल्या वल्गना.

पत्त्यांचे बंगले क्षणीं ढासळले,
आतां पश्चात्तापें मन भांबावलें.

जीवनाची संध्या देहावरी येई,
एकांतांत मना भूतें नित खातीं.

दुःखी हें जीवन पुरें पुरें आतां,
येई प्रभो आतां तुझी भेट द्याया.

*

१५-१२-१९४८

# ये कवी जरासा—

दृष्टि लाविसी कां शून्यावरि ?
ये कवी जरासा जगत्–तलावरि. ॥ धृ० ॥

एकांताच्या सोड कल्पना,
अध्यात्माच्या पुरें वल्गना,
वास्तवतेची धरीं कामना,

काव्यव्योमीं उंच भरारी—
मारुनि न मिळे तुजला भाकरि.

जीव वदतसे—"जीवन दे मज,
नातर मोडुनि शरिराचे गज
अन्य जगामधिं पकडिन सावज,

तेंथुनि मारिन तुजला खर शर,
शून्यालाही करीन जर्जर."

म्हणूनि, पाहुनि तमीं तारका,
कष्टें जमवुनि काव्य-कारिका,
कशासि गुंफिसि स्वप्नमालिका ?

करपुनि जाती कलिका भूवरि,
जीवन देण्या घे झारी करिं.

ज्वालाग्राही आतपकिरणें
जाळिति जगतीं कितीक सुमनें,
गुहेंत आतां कशासि बसणें ?

अंधारांतुनि ये बाहेरी,
कर नाशाया शस्त्र घे करीं.

*

६–१०–१९४९

# जा जरा खेड्यामधीं—

पाहिजे स्वातंत्र्य तुजला का गड्या रे सत्वरीं ?
जा तरी खेड्याप्रति, अन् औत नांगर घे करीं..

हिंदभूचीं अज्ञ बाळें नांदतीं खेड्यामधीं,
जीं स्वताचें पोट भरण्यां मग्न उद्योगामधीं;

उघडिं गरिबांच्या हितार्थी संघशक्तीपाणपोई,
पाज ग्रामोद्योग-अमृत, स्वावलंबी त्यां करी;

माल परदेशी त्यजोनी दे स्वदेशींचे धडे,
अन् स्वताच्या स्वर्णभूमीं लाव समता-रोपडें.

फिरव चरखा ज्यांत भरलें तेज राष्ट्राचें खरें,
नाहिं दूरी आमुचें स्वातंत्र्य, कार्यां लाग रे !

पूज्य देशांतील नेते सांगती आक्रोशुनी—
पसरवी ते बोल खेड्यांतील अज्ञानी जनीं.

ऊठ तरुणा, लाग कार्या, जा जरा खेड्यामधीं,
साह्य कुणब्यांना करोनी देव हो त्यां आपदीं.

*

६-६-१९४६

## विशाल विश्वामाजीं जाऊं

जुन्या जगाचें अंडें फोडुनि
विशाल विश्वामाजीं जाऊं,
लहानसें डबकें सोडोनी
विशाल सागरिं न्हाया जाऊं.

सिंधूमाजीं पापें धुवुनी
शुचित मनानें पंथ आक्रमूं,
मानवतेच्या ध्वजा घेउनी
नव क्रांतीचीं गाणीं गाऊं.

मंगल तोरण गडास बांधूं,
उंचउंचशा गुढ्या उभारूं,
भावसुमांच्या माला गुंफूं,
प्रेमफवारे उपवनिं उडवूं.

हसूं लागली भारतमाता
चला, चला हो, दर्शन घेऊं.

*

२७-२-१९४१

# ही नवीन पाउलवाट

सख्या, ही नवीन पाउलवाट. ॥ धृ० ॥

उजव्या बाजुस उंच हिमालय,
डाव्या बाजुस खोल जलाशय,
पुसट पुसट या वाटेवरुनी
चढणें तुजला घाट.

जातां जातां उंच सखलता,
कपऱ्यांचे कंगोरे उडतां
उडवुनि देउनि भीति मनांतिल
धर सामर्थ्य अचाट.

ज्वालामुखि कधिं उठेल उसळुनि,
हिमही ग्रासिल सिंचन करुनी.
युद्ध खेळण्या त्यांच्यासंगें
मुठीस चल वळवीत.

नागवेलिपरि वळसे घेत,
धूलिकणांना कधिं उधळीत,
अज्ञाताच्या मार्गावरुनी
बघ देवीचा थाट.

रात्र संपली, अरुण उदेला,
तुझ्या स्वागता उभा ठाकला,
मानव्याचें सुमधुर संगित
वाटचाल कर गात.

सख्या, ही नवीन पाउलवाट.

१७-१०-१९५४

*

# वि शा ल वि श्वा मा जीं जा ऊं

जुन्या जगाचें अंडें फोडुनि
विशाल विश्वामाजीं जाऊं,
लहानसें डबकें सोडोनी
विशाल सागरिं न्हाया जाऊं.

सिंधूमाजीं पापें धुवुनी
शुचित मनानें पंथ आक्रमूं,
मानवतेच्या ध्वजा घेउनी
नव क्रांतीचीं गाणीं गाऊं.

मंगल तोरण गडास बांधूं,
उंचउंचशा गुढ्या उभारूं,
भावसुमांच्या माला गुंफूं,
प्रेमफवारे उपवनिं उडवूं.

हसूं लागली भारतमाता
चला, चला हो, दर्शन घेऊं.

*

२७-२-१९४१

## ही नवीन पाउलवाट

सख्या, ही नवीन पाउलवाट. ॥ धृ० ॥

उजव्या बाजुस उंच हिमालय,
डाव्या बाजुस खोल जलाशय,
पुसट पुसट या वाटेवरुनी
चढणें तुजला घाट.

जातां जातां उंच सखलता,
कपच्यांचे कंगोरे उडतां
उडवुनि देउनि भीति मनांतिल
धर सामर्थ्य अचाट.

ज्वालामुखि कधिं उठेल उसळुनि,
हिमही ग्रासिल सिंचन करुनी.
युद्ध खेळण्या त्यांच्यासंगें
मुठीस चल वळवीत.

नागवेलिपरि वळसे घेत,
धूलिकणांना कधिं उधळीत,
अज्ञाताच्या मार्गावरुनी
बघ देवीचा थाट.

रात्र संपली, अरुण उदेला,
तुझ्या स्वागता उभा ठाकला,
मानव्याचें सुमधुर संगित
वाटचाल कर गात.

सख्या, ही नवीन पाउलवाट.

१७-१०-१९५४

*

# तो च श शि अ न् ते च ता रे-१

[ पतीनें निर्माण केलेल्या प्रश्नास—

तोच शशि अन् तेच तारे
करिति मुदमय मानसाला;
तीच रजनी नित्य येते
ओढ लावाया हृदाला.

त्याच लहरी सागराच्या
नृत्य करिती जीवनाचें,
अर्पिती नादांत अपुल्या
पृथ्विला नित रत्नमाला.

तेच वारे शांततेनें
पावुलें टाकीत अपुलीं,
करुनि हितगुज लहरिसंगें
गंध देती नासिकाला.

तेंच नभ क्षिरकुंभ आणुनि
ओतितें त्या अवनिवरतीं,
जीवनाची वृष्टि पाहुनि
भरति येई सागराला.

शांत सागर, शांत पृथ्वी,
शांत शशि अन् शांत रजनी;
क्षुद्र मानव व्हायचा कधिं—
शांत ? न कळें मन्मनाला.

— के. अम्बादास

( शं. वि. कुलकर्णी )

८-३-१९५१

*

## तोच शशि अन् तेच तारे–२

—पत्नीचें उत्तर ।

तोच शशि अन् तेच तारे
स्मरण देती मानवाला,
तीच रजनी नित्य येते
ओढ लावाया मनाला.

त्याच लहरी सागराच्या
नृत्य करुनी, जीवनाचें—
लोपणाऱ्या लहरिसंगें—
दाविती वैफल्य साचें.

मंद वारा गंध देई
आणि हृदया जागृति,
कोण तूं? आणीक कुठला ?
काय तुझी अस्मिता ?

खेळ माया खेळते
कोंडुनी आत्मा शरीरीं,
व्यर्थ चिंता झांकळीते
तेजस्विता अंतरींची !

त्याच तेजांतूनि आला
जेथुनि रविशशि तेजाळले,
त्याच अथांगातूनि प्रगटला
जिथुनि सागर नाच नाचे.

पूर्वस्मृतिनें विकल मानव,
शांति कैशी अंतरीं ?
लाभेल शांतता अन् पूर्णता
जेव्हां विलीन अवकाशीं.

**सौ. प्रतिभा शं. कुलकर्णी**
बी. ए. ( ऑनर्स ), बी. टी., रा. भा. कोविद
१८–३–१९५१

*

# आलिस तूं अन्—

[ —पतीच्या आक्षेपास—

आलिस तूं अन् प्रतिभा मेली,
मसणवटीच्या मार्गें गेली,
सप्तपदीच्या पाठीमागुन
सप्तसिंधुच्या पल्याड झाली.
तुझ्या करांच्या विळख्यासरशीं
स्वप्नसमाधी भंगुनि गेली,
बुद्धीनें अन् भावुकतेवर
क्षणांत संगरिं मातच केली !
'प्रतिभा' या तव नांवासंगें
प्रतिभालय मम रितें जाहलें,
कधिं पाण्यास्तव सुटतां घागर
खडकावरतीं फुटूनि जाते.
व्यवहाराचा उष्ण सहारा
तव सांगाती येथें आला,
आणिक परमार्थाच्या मित्रा
सदनीं माझ्या जाळित सुटला.
सत्याचरणी सखीविना मम
जीवन जगणें म्हणजे मरणें,
मिथ्याचरणीं तुझ्या संगतीं
जीवन जगणें ? केवळ असणें !
बनशिल का तूं शुक्रकन्यका
आचार्याला विनंति करण्या ?
संजिवनीच्या मंत्रासरशीं
येइल मंदिरिं माझी प्रतिभा !

* —के. अम्बादास

१३–५–१९५४ (शं. वि. कुलकर्णी)



क्र. क. ९०४५५

## का उदास होसी, कवीवरा ?

—पत्नीचें उत्तर— ]

कां उदास होसी, कविवरा ? ॥ धृ० ॥
व्यवहाराचा उष्ण सहारा
मम सांगाती येथें आला,
वितळुनि टाकी तव स्वप्नांना,
का स्वप्नीं रमसी, कवीवरा ?
जीवन अपुलें विशाल संगर,
त्यांत लढोनी नांव सार्थ कर,
यशापयशाची नकोच खातर,
कां धीर सोडिसी कवीवरा ?
महान् ध्येयास्तव जो सजला
लढतां संग्रामीं ना डरला,
जीवन त्याचें नच हो वाया,
का काव्य नसें तें कवीवरा ?
चार ओळिचीं कवनें करणें
प्रतिभेचें जें नव्हेंच देणें,
क्षणांत वाचुनि विसरुनि जाणें
तो आभासच रे, कवीवरा !
उदात्त ध्येयें उरीं बाळगुन
जीवनसंगर नित्य चालवुन
प्रकटे साऱ्या अनुभूतींतुन
सत्स्फूर्ति तीच रे कवीवरा !
स्वप्निल काव्यें जरी थांबलीं,
अनादि सत्यें उभीं ठाकलीं,
म्हणोत कोणी प्रतिभा मेली,
ती जीवनदायी, कवविरा.

* **सौ. प्रतिभा शं. कुलकर्णी**

१-८-१९५४ बी. ए. (ऑनर्स), बी. टी., रा. भा., कोविद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 28029 दि. 3/8/55.
क्रमांक 9832

# हा आवडेल का हार तुला?

हा आवडेल का हार तुला? ॥ धृ० ॥
घाणेरीचीं फुलें तोडिलीं
गांवशिवेच्या बांधावरलीं
कडक उन्हें जीं सुकूनि गेलीं
हार तयांचा मी गुंफियला,
हा आवडेल का हार तुला?
अडूळश्याचीं फुलें पांढरीं,
भृंग तयांतिल मधास हारी,
विदीर्ण झालीं त्यानें भारी,
गुंफियली मी त्यांची माला,
हा आवडेल का हार तुला?
रानफुलें हीं माळावरलीं
अरसिक चरणीं दबलीं गेलीं
आधार मात्र ज्यां भूमितलीं
रंग तयांचा येथ मिळविला,
हा आवडेल का हार तुला?
पवित्र तुळशीच्या मंजीऱ्या,
श्यामसांवळ्या ज्यांच्या काया,
मधोमधीं मी डुलत ठेविल्या;
भाविकतेनें हार गुंफिला,
हा आवडेल का हार तुला?

१८-१०-१९४३ *

REFBK-0010557
REFBK-0010557